# महाराष्ट्र विधानसभा

## दुसरे अधिवेशन, २०१५

---

## अतारांकित प्रश्नोत्तरांची यादी

**प्रश्नांची एकूण संख्या - ५०**

---

### सातारा जिल्हयात २७६७ अंगणवाड्यांना अंगणवाड्या भरविणेकरीता इमारतीच नसलेबाबत

**(१) १०२०० (०७-०४-२०१५). श्री. शंभुराज देसाई (पाटण) :** सन्माननीय **महिला व बाल कल्याण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) सातारा जिल्हयातील राज्य शासनाच्या महिला आणि बालविकास विभागाच्या वतीने ४७६६ इतक्या अंगणवाड्या सुरु आहेत, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, ४७६६ इतक्या अंगणवाड्यांपैकी २७६७ इतक्या अंगणवाड्यांना अंगणवाड्या भरविण्याकरीता इमारतीच नाहीत, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, सातारा जिल्हयातील अंगणवाड्यांच्या इमारती नसलेल्या अंगणवाड्या या कुठे समाजमंदीरात तर कुठे भाड्याच्या घरात भरविल्या जात आहेत हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, यासंदर्भात राज्य शासनाने चौकशी केली आहे काय,

(५) असल्यास, सातारा जिल्हयात महिला आणि बालविकास विभागातंर्गत सुरु असलेल्या २७६७ इतक्या अंगणवाड्यांना अंगणवाड्या भरविण्याकरिता इमारती देणेसंदर्भात राज्य शासनाने कोणता निर्णय घेतला आहे,

(६) यासंदर्भात राज्य शासनाने निर्णय घेतला नसल्यास, निर्णय न घेण्याची सर्वसाधारण कारणे काय आहेत ?

**श्रीमती पंकजा मुंडे (२६-०५-२०१५) :** (१) सातारा जिल्हयात ४७९९ इतक्या अंगणवाडया सुरु आहेत.

(२) अंशत: खरे आहे.

उपरोक्त ४७९९ अंगणवाडयांपैकी २०६२ अंगणवाडयांना स्वतंत्र इमारती उपलब्ध आहेत. उर्वरित २७३७ अंगणवाडयांना स्वतंत्र इमारती नाहीत.

(३) अंशत: खरे आहे.

२७३७ अंगणवाडयांपैकी भरण्याची ठिकाणे पुढीलप्रमाणे आहेत :-

प्राथमिक शाळा-८४८, ग्रामपंचायत इमारती-२८३, समाजमंदिर-३२८,

खाजगी/देऊळ-३२७, भाडयाच्या इमारती-८२४, अन्य व्यवस्था (उदा.विकास संस्था, पडवी, इ.)-१२७

(४), (५) व (६) जिल्हा नियोजन समितीकडून दरवर्षी प्राप्त होणाऱ्या नियतव्ययानुसार अंगणवाडयांना स्वतंत्र इमारत मंजूर केल्या जातात. माहे फेब्रुवारी, २०१५ नंतर जिल्हा नियोजन समिती अंतर्गत एकूण २७ अंगणवाडयांची कामे पुर्ण झाली आहेत. सन २०१४-१५ मध्ये २६५ अंगणवाडयांना स्वतंत्र इमारती मंजूर करणेत आलेल्या आहेत. सन २०१५-१६ मध्ये १७१ अंगणवाडी इमारतींना मंजूरी देणे प्रस्तावित आहे.

तसेच शासनाच्या डोंगरी विकास कार्यक्रमाअंतर्गत सन २०१४-१५ मध्ये ३४ अंगणवाडयांची कामे प्रगतीपथावर आहेत.

---

**पाटण, जि. सातारा येथील निवडणुकीत काम केलेल्या आशा कार्यकत्यांचे मानधन देण्याबाबत**

**(२) १०२०२ (०६-०४-२०१५). श्री. शंभुराज देसाई (पाटण) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) पाटण, जि. सातारा येथील लोकसभा, विधानसभा सन २०१४ च्या निवडणुकीत आशा कार्यकर्त्यांचे कामाचे मानधन देण्यात आले नाही, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर आशा कार्यकर्त्यांनी माहे जानेवारी, २०१५ मध्ये कामांचे मानधन मिळणेकरिता तहसिल कार्यालयावर मोर्चा काढला होता,व मागणीचे निवेदन पाटणचे तहसिलदार यांना दिले, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, निवेदनावर राज्य शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (३०-०५-२०१५) :** (१) व (२) होय.

(३) लोकसभा व विधानसभा २०१४ च्या निवडणूकीमध्ये मतदानाच्या दिवशी मतदान केंद्रावर काम केलेल्या आशा कार्यकत्यांचे मानधन अदा करण्यात आले नाही.

(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

**पाटण तालुक्यातील मोरणा गुरेघर धरण प्रकल्पाच्या माध्यमातून सुरु असलेल्या कॅनॉलचे काम चुकीच्या पध्दतीने सुरु असल्याबाबत**

**(३) १०२०३ (०७-०४-२०१५). श्री. शंभुराज देसाई (पाटण) :** सन्माननीय **जलसंपदा मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) सातारा जिल्ह्यातील पाटण तालुक्यात कृष्णा खोरे विकास महामंडळांतर्गत मोरणा गुरेघर हा मध्यम धरण प्रकल्प साकारण्यात आला आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास,या धरण प्रकल्पाच्या माध्यमातून या विभागातील शेतीला पाणी देणेकरीता कॅनॉलचे काम सुरु करण्यात आले आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, धरणप्रकल्पाच्या डाव्या व उजव्या बाजुने येणा-या कॅनॉलमधील पाणी हे या विभागातील डोंगरपायर्थ्यापर्यंच्या शेतीला मिळत नसून डोंगराकडेचे बहूतांशी जमीन क्षेत्र हे कोरडे रहात आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, सध्या सुरु असलेल्या कॅनॉलचे काम हे या परिसरात वसलेल्या गावांच्या मधोमधून सुरु असून यामध्ये या कोकीसेर या गावांतील नागरिकांच्या घरातून हा कॅनॉल जात आहे, हे ही खरे आहे काय,

(५) असल्यास, डोंगर पायथ्यापर्यंत क्षेत्राला पाणी मिळणेकरीता राज्य शासनाने सध्या सुरु असललेल कॅनॉलचे काम हे चुकीच्या पध्दतीने सुरु असून हे काम बदलणेत यावे व या विभागातील १०० टक्के क्षेत्राला पाणी मिळावे अशी मागणी शेतक-यांनी राज्याचे मुख्यमंत्री यांचेकडे केली आहे, हे ही खरे आहे काय,

(६) असल्यास, याबाबत राज्य शासनाने कोणता निर्णय घेतला आहे, नसल्यास निर्णय न घेण्याची सर्वसाधारण कारणे काय आहेत ?

**श्री. गिरीष महाजन (२९-०५-२०१५) :** (१) होय.

(२) होय.

(३) नाही.

(४) नाही.

सद्या डाव्या कालव्याचे काम हे कोकीसरे गावांतर्गत असलेल्या कुंभारवाडीतील नागरीकांच्या घरापासून १०० मी. अंतरावरुन जात आहे.

(५) व (६) प्रश्न उद्भवत नाही.

---

## खाजगी संस्थांमध्ये १५ ते २० हजार रुपये पगाराच्या मर्यादेपुढे व्यवसाय कर कपात करण्याबाबत

**(४) १०२०७ (०७-०४-२०१४). श्री. शंभुराज देसाई (पाटण) :** सन्माननीय **वित्त मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) खाजगी संस्थांमध्ये ज्या मजुराचा ७५०० /- रुपये मासिक पगार आहे त्याचे पगारातून रु. १५०/- व्यवसाय कर कपात केला जातो, हे खरे आहे काय,

(२) असल्यास सध्याची महागाईची परिस्थिती पाहता खाजगी संस्थांमध्ये ज्यांच्या पगारांची मर्यादा १५ ते २० हजारांच्या पुढे आहे अशांच्या पगारातून व्यावसाय कर कपात करावा अशी अनेक वर्षापासून खाजगी संस्था धारकांची मागणी होत आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास याबाबत राज्य शासनाने कोणता निर्णय घेतला आहे,

(४) नसल्यास निर्णय लवकर घेण्याची सर्वसाधारण कारण काय आहेत. ?

**श्री. सुधीर मुनगंटीवार (०७-०४-२०१४) :** (१) होय, मासिक वेतन वा मजूरी रु. ७५०१/- ते रु १०.०००/- असलेल्या पुरुषांच्या वेतन वा मजूरी मधून कपात करण्यात येणाऱ्या व्यवसाय कराची रक्कम दरमहा रु. १५०/- नसून, रु. १७५/- इतकी आहे. स्त्रियांच्या बाबत रु. १०,०००/- पर्यत मासिक वेतन वा मजुरी असल्यास व्यवसाय कर लागत नाही.

(२) होय,

काही व्यक्ती तसेच काही औद्योगिक संस्थांकडून व्यवसाय कर माफीसाठी असलेली वेतन वा मजूरीची मयारदा वाढविण्याची विनंती करण्यात आली आहे. परंतू सदर व्यक्ती वा संस्थाकडून मागणी करण्यात आलेली वेतन वा मजुरीची मर्यादा वेगवेगळी आहे.

(३) दि. १.७.२०१४ पूर्वी मासिक वेतन वा मजूरीची रक्कम रु. ५,०००/- पर्यत असलेल्या व्यक्तींना व्यवसाय करामधून सूट देण्यात आली होती.

दि. ०१.०७.२०१४ पासून सदर मर्यादा रु. ७,५००/- करण्यात आली. तसेच दि. ०१.०४.२०१५ पासून महिलांसाठी सदर मर्यादा रु. १०,०००/- करण्यात आली आहे.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

## केंद्र शासनाच्या एआयबीपी मधून पाटण विधानसभा मतदारसंघातील तारळी धरण प्रकल्पातंर्गत देण्यात येणा-या उपसा जलसिंचन योजनांच्या निधीची चौकशी करणेबाबत

**(५) १०२१२ (०८-०४-२०१५). श्री. शंभुराज देसाई (पाटण) :** सन्माननीय **जलसंपदा मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) पाटण विधानसभा मतदारसंघामध्ये केंद्र शासनाच्या एआयबीपी मधून तारळी धरण प्रकल्पांतर्गत मौजे बांबवडे, तारळे, आवर्डे, धुमकवाडी व कोंजवडे याठिकाणी उपसा जलसिंचन योजनांना निधी देण्यात येणार आहे हे खरे आहे काय,

(२) असल्यास, या प्रकल्पांतर्गत खरोखरच या उपसा जलसिंचन योजनांची कामे करण्याकरीता केंद्र शासनाने निधी देवू केला आहे काय, असल्यास राज्य शासनास या निधी संदर्भात माहिती आहे काय,

(३) असल्यास, केंद्र शासनाच्या एआयबीपी कडून निधी मिळाला नसल्याने या उपसा जलसिंचन योजनांची कामे ठप्प आहेत याची चौकशी राज्य शासनाने केली आहे काय,

(४) नसल्यास, केंद्र शासनाच्या एआयबीपी कडून तारळी धरण प्रकल्पातंर्गत उपसा जलसिंचन योजनांना निधी उपलब्ध नसताना या योजनांचे भूमिपूजन करणा-या तत्कालीन मंत्र्यांच्यावर राज्य शासन कोणती कारवाई करणार आहे,

(५) असल्यास,त्याचे थोडक्यात स्वरुप काय,

(६) अद्याप याबाबत राज्य शासनाने निर्णय घेतला नसल्यास निर्णय न घेण्याची सर्वसाधारण कारणे काय आहेत ?

**श्री. गिरीष महाजन (०१-०६-२०१५) :** (१) होय, हे खरे आहे.
(२) केंद्र शासनास सादर केलेल्यं प्रस्तावामध्ये या घटकांच्या कामांचा समावेश आहे.
(३) केंद्र शासनाच्या एआयबीपी योजनेअंतर्गत सन २००७-०८ पासून निधी मिळत आहे. तारळी प्रकल्पाच्या कामासावठी सन २०१४-१५ मध्ये रु.१.०९ कोटी इतका निधी केंद्र शासनाकडून प्राप्त झाला आहे. तसेच रज्य शासनाच्याहिश्याच्या निधी उपलब्धतेनूसार कामे सुरु आहेत. तारळे, बांबवडे उपसा सिंचन योजनेची कामे पूर्ण झाली आहेत. उर्वरीत कामे प्रगतीपथावर आहे.
(४), (५) व (६) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

**शिवाजी नगर मानुखुर्द परिसरातील शिधापत्रिका धारकांना अन्नधान्य व रॉकेलचा पुरवठा निमिष्ठा नुसार व विगतवारी नुसार करण्याबाबत**

**(६) १०२४० (०७-०४-२०१५). श्री. अबू आजमी (मानखूर्द शिवाजीनगर) :** सन्माननीय **अन्न, नागरी पुरवठा व ग्राहक संरक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) शिवाजी नगर मानखुर्द (मुंबई) परिसरातील नागरिकांच्या जीवनावश्यक अन्नधान्य तसेच रॉकेलचा पुरवठा विगतवारी व निमिष्ठा नुसार करण्याच्या मागणीबाबत स्थानिक लोकप्रतिनिधी, सेवाभावी संघटनांचे पदाधिकारी यांनी मा.मुख्यमंत्री, मा.अन्न व नागरी पुरवठा मंत्री, मा.अन्न व नागरी पुरवठा राज्य मंत्री, प्रधान सचिव, अन्न व नागरी पुरवठा विभाग व संबंधित शिधावाटप यंत्रणेचे क्षेत्रिय अधिकारी तथा नियंत्रक यांच्याकडे माहे डिसेंबर, २०१४ मध्ये वा त्या दरम्यान लेखी निवेदनाव्दारे केली आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, सदरहु मागणीच्या अनुषंगाने कोणता निर्णय घेण्यात आला वा येत आहे,
(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. गिरीश बापट (१३-०५-२०१५) :**(१) व (२) होय, अशा प्रकारचे निवेदन प्राप्त झाले आहे.
तथापि, मानखुर्द शिवाजी नगर भागात सार्वजनिक वितरण व्यवस्थेंतर्गत पात्र लाभार्थ्यांना विहित परिमाणानुसार शिधावस्तूंचा पुरवठा करण्यात आला आहे. सार्वजनिक वितरण व्यवस्थेंतर्गत शिधावस्तूंचा पुरवठा सुरळीत व वेळेवर होण्याबाबत संबंधितांना आवश्यक सूचनाही देण्यात आलेल्या आहेत. अन्नधान्य व केरोसिन न मिळाल्याबाबत शिधावाटप कार्यालयास कोणतीही तक्रार प्राप्त नाही.
(३) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

**सोलापूर जिल्हयातील बंद पाणी पुरवठा योजना सुरु करण्याबाबत**
**(७) १०३२४ (०७-०४-२०१५). श्री. बबनराव शिंदे (माढा), श्री. जितेंद्र आव्हाड (मुंब्रा कळवा), श्री. रमेश कदम (मोहोळ), श्री. अमित विलासराव देशमुख (लातूर शहर) :** सन्माननीय **पाणीपुरवठा आणि स्वच्छता मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) सोलापूर जिल्हयात शासनाने प्रादेशिक नळ पाणीपुरवठा योजना कार्यान्वित केल्या आहेत, तथापि सदर योजना अद्याप पूर्ण झाल्या नसताना टँकरने पाणी पुरवठा करण्याचे बंद केल्याने नागरिकांची गैरसोय होत आहे, हे खरे आहे काय,
(२) तसेच, उक्त जिल्ह्यात गत चार वर्षात पाणी टंचाईच्या नावाखाली टँकरवर १०३ कोटी रुपयांचा निधी खर्च झाला आहे व जीवन प्राधिकरणाच्या १४ पाणीपुरवठा योजनांपैकी केवळ ४ योजना चालू असून उर्वरीत ब-याच वर्षापासून बंद आहेत जि.प.च्या १५ प्रादेशिक योजनांपैकी ८ बंद आहेत तसेच काही योजना वीज बीलाअभावी बंद व नादुरुस्त आहेत, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, उक्त प्रकरणी शासनामार्फत चौकशी केली आहे काय, चौकशीत काय आढळून आले,
(४) असल्यास, तदनुसार ज्या पाणीपुरवठा योजना वीज बिलाअभावी बंद व नादुरुस्त आहेत अशा योजना सुरु करण्याबाबत तसेच कायमस्वरुपी पाणीपुरवठा करण्याबाबत व तातडीने टँकरने पाणी पुरवठा करण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(५) अद्याप कोणतीच कार्यवाही केली नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. बबनराव लोणीकर (०८-०५-२०१५) :** (१) हे खरे नाही.
(२) होय, हे खरे आहे.
(३) व (४) वीज देयके वेळेवर न भरणे, आवश्यक ती देखभाल दुरुस्ती न करणे तसेच या गावांत पाण्याची अन्य साधने उपलब्ध असल्याने प्रादेशिक योजनांमधून पाण्याची मागणी नसणे या प्रमुख कारणांमुळे योजना बंद आहेत. या योजना सतत सुरु राहाव्यात यासाठी संबंधित ग्रामपंचायतीशी बैठका घेऊन नियमाप्रमाणे पाणीपट्टीची आकारणी करणे व त्याची वसुली करण्याच्या सुचना क्षेत्रीय स्तरावर देण्यात आल्या आहेत.

पाणीपुरवठा योजनांच्या अदा करण्यात आलेल्या वीज देयकाच्या ५० टक्के रक्कमेची प्रतिपूर्ती देखभाल दुरुस्ती प्रोत्साहन अनुदानांतर्गत संबंधित स्थानिक स्वराज्य संस्थांना देण्यात येते. पाणी टंचाई निर्माण झाल्यास मंजूर कृती आराखडयानुसार आवश्यक उपाययोजना करण्याचे नियोजन जिल्हास्तरावर करण्यात आले आहे.
(५) प्रश्न उद्भवत नाही.

---

**प्रत्यक्ष वीजमीटर रीडिंग आणि वीज बिल यात तफावत असल्याबाबत.**

**(८) १०३५८ (०७-०४-२०१५). श्री. आसिफ शेख (मालेगांव मध्य) :** सन्माननीय **ऊर्जा मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) प्रत्यक्ष वीजमीटर रीडिंग आणि वीज बिल यात तफावत असल्याने विजबिलावर मीटर रिंडीग छायाचित्र छापले जात नसल्याने नेमके किती बिल आकारले या संभ्रमात डोंबिवली (जि.ठाणे) येथील वीजग्राहक पडले असल्याचे माहे जानेवारी, २०१५ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, वीज ग्राहकांना किती वीज बिल आकारले हे कळण्यासाठी वीज बिलावर मीटर रिडींगचे छायाचित्र छापली जायची मात्र आता वीज बिलावर मीटर रिडींगचे छायाचित्रे छापणे बंद केल्याने नागरिकांना याबाबत अचानक जास्त विज बिले यावयास लागण्याने संबंधित विभागातील नागरिकांनी वीज वितरण कंपनीच्या कार्यालयात तक्रार केली असता अद्यापही संबंधितांनी दखल घेतली नसल्याने नागरिकांचे आर्थिक नुकसान होत असल्याने शासन यावर आवश्यक ती कार्यवाही करणार आहे काय,
(३) नसल्यास, यामागील विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. चंद्रशेखर बावनकुळे (२९-०५-२०१५) :** (१) नाही.
(२) महाराष्ट्र राज्य वीज वितरण कंपनीच्या धोरणानुसार नवीन टेक्नॉलॉलीचे आर.एफ.मीटर बसविण्यात येत आहेत. डोंबिवली विभागातंर्गत असलेल्या १,६६,००० घरगुती व वाणिज्य वीज ग्राहकांपैकी सुमारे ३६,५०० वीज ग्राहकांना नवीन तंत्रज्ञानाचे आर.एफ.मीटर बसविले आहेत. त्यांचे रिडींग एच.एच.यू. मशीनद्वारे घेतले जात असल्यामुळे त्या मीटरचे फोटो वीज बिलावर छापून येत नाहीत. वीज बिले मात्र अचूक मीटर वाचनाप्रमाणे दिली जातात. तांत्रिक अडचणींमुळे काही आर.एफ.मीटरचे रिडींग एच.एच.यू. मशीनद्वारे येत नाही अशा मीटरचे प्रत्यक्ष मीटर वाचन करुन बिल देण्यात येते. आर.एफ. टेक्नॉलॉजीचे मीटर बसविल्यामुळे मानवी हस्तक्षेप कमी झाल्यामुळे ग्राहकांना अचुक बिले येतात. या प्रकारामध्ये नागरीकांचे/वीज ग्राहकांचे कोणत्याही प्रकारचे आर्थिक नुकसान होत नाही.
(३) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

**औरंगाबाद येथील भराडी स्थानिक महावितरण के ३३ केवी उपकेंद्र चे कनिष्ठ अभियंता पद रिक्त असल्याबाबत**

**(९) १०३५९ (३०-०४-२०१५). श्री. अब्दुल सत्तार (सिल्लोड) :** सन्माननीय **ऊर्जा मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) औरंगाबाद येथील भराडी स्थानिक महावितरण के ३३ केवी उपकेंद्र चे कनिष्ठ अभियंता पद मागील दोन वर्षापासून रिक्त असल्याचे माहे जानेवारी, २०१५ रोजी वा त्या सुमारास निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, यामुळे आमठाणा येथील कनिष्ठ अभियंत्याकडे अतिरिक्त पदभार दिला असल्यामूळे ग्राहकांची गैरसोय होत असून भराडी सबस्टेशन अंतर्गत १८ गाव येत असून दोन सब स्टेशन अंतर्गत ५१ गांवाकरिता एक कनिष्ठ अभियंता कार्यरत असल्याने शेतकरी व ग्राहक यांना त्रास होत असल्याने रिक्त असलेले कनिष्ट अभियंता पद भरण्याबाबत आवश्यक ती कार्यवाही करणार आहे वा करण्यात येत आहे
(३) नसल्यास, यामागील विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. चंद्रशेखर बावनकुळे (१३-०५-२०१५) :** (१) हे अंशत: खरे आहे.

भडारी शाखा कार्यालयातील सहाय्यक अभियंता (कनिष्ठ अभियंता) हे पद दि.९ ऑगस्ट, २०१४ पासून रिक्त आहे.

(२) भडारी शाखा कार्यालयाचा अतिरिक्त पदभार या पूर्वी आमठाणा शाखा कार्यालयातील सहाय्यक अभियंता (कनिष्ठ अभियंता) यांना सोपविण्यात आला होता. सदर पदभार दि.२४.०२०२०१५ पासून सहाय्यक अभियंता कन्नड विभागीय कार्यालय यांच्याकडे सोपविण्यात आला आहे.

अभियंता संवर्गातील रिक्त पदे भरण्याकरिता जाहिरात क्र.४/२०१४, दि.२६.०७.२०१४ व जाहिरात क्र.६/२०१४, दि.१६.१२.२०१४ नुसार भरती प्रक्रिया सुरु आहे.

(३) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

**अंधारी (जि.औरंगाबाद) येथील डीपी बदलण्याबाबत**

**(१०) १०३६० (३०-०४-२०१५). श्री. अब्दुल सत्तार (सिल्लोड) :** सन्माननीय **ऊर्जा मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) अंधारी (जि.औरंगाबाद) येथे डीपी बदलण्यासाठी वारंवार मागणी करुनही त्याकडे दुर्लक्ष केल्याने तेथील वीज ग्राहकांनी कनिष्ठ अभियंत्यांना घेराव घालून मागण्याचे निवेदन दिले असल्याचे माहे जानेवारी, २०१५ रोजी वा त्या सुमारास निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उक्त निवेदनानुसार या प्रकरणी शासनाने काय कार्यवाही केली आहे वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, यामागील विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. चंद्रशेखर बावनकुळे (२४-०४-२०१५) :** (१) होय.

(२) सदरील ठिकाणचे रोहित्र बदलुन विज पुरवठा सुरळीत करण्यात आला आहे.

(३) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

**औरंगाबाद जिल्ह्यातील स्थानिक ग्रामपंचायतीना आईएसओ दर्जा मिळण्याबाबत**

**(११) १०३६३ (०७-०४-२०१५). श्री. अब्दुल सत्तार (सिल्लोड) :** सन्माननीय **ग्रामविकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) औरंगाबाद जिल्ह्यातील स्थानिक ग्रामपंचायतीना आईएसओ दर्जा मिळण्याकरिता अनेक प्रयत्न करुन सुशोभिकरण, सोयी सुविधा सदरहू ग्रामपंचायतीमध्ये उपलब्ध करुन दिली जात असल्याचे माहे जानेवारी, २०१५ रोजी वा त्या सुमारास निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उक्त जिल्ह्यात २५० गांवे असून आईएसओ दर्जा मिळावा हे उद्दीष्ट संबंधित जि.प. ठेवले असून त्याअनुषंगो कार्यवाही सुरु असून सदरहू प्रमाणपत्र मिळण्याबाबत शासन आवश्यक कार्यवाही करणार वा करीत आहे काय,
(३) नसल्यास, यामागील विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्रीमती पंकजा मुंडे (१९-०५-२०१५) :** (१) होय.
(२) औरंगाबाद जिल्ह्यातील २५० ग्रामपंचायतींना आ.एस.ओ. दर्जा मिळण्यासाठी ग्रामपंचायत, पंचायत समिती व जिल्हा परिषदेमार्फत कार्यवाही सुरु आहे.
(३) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

**बुलडाणा जिल्ह्यात विद्‌युत वितरण कंपनीत २५ वर्षात नविन कायमस्वरुपी तांत्रिक कामगारांची भरती करण्यात आली नसल्याबाबत**

**(१२) १०३८४ (३०-०४-२०१५). श्री. राहुल बोंद्रे (चिखली) :** सन्माननीय **ऊर्जा मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) बुलडाणा जिल्ह्यात १३ तालुके असून विद्‌युत वितरण कंपनीचे वाहीनी राहित्र १३४२९ आहे व ६ लक्ष २१ हजार २०७ ग्राहकांची संख्या असतांना अवघ्या श्रेणीतील तांत्रिक कामगारांची संख्या केवळ ८२० इतकी आहे, हे खरे आहे काय,
(२) सन १९८९ मध्ये बुलडाणा जिल्ह्यात विद्‌युत वितरण कंपनी अंतर्गत तांत्रिक कामगारांची संख्या जवळपास ३ हजार इतकी होती आणी २५ वर्षात नविन कायमस्वरुपी तांत्रिक कामगारांची भरती करण्यात आली नसल्याने जिल्ह्यात केवळ ८२० तांत्रिक कामगार काम करीत असल्याने त्याच्यावर प्रचंड ताण येत असल्याचे संघटनेने मा.मुख्यमंत्री यांना दिनांक २८ नोव्हेंबर, २०१४ रोजी अथवा त्या सुमारास निवेदन दिले आहे, हे देखील खरे आहे काय,
(३) असल्यास, या निवेदनानूसार शासनाकडून तांत्रिक कामगारांची नविन पदे भरती करण्या संदर्भात काय कार्यवाही करण्यात आली आहे वा करण्यात येत आहे,
(४) असल्यास, अद्यापपर्यंत पदे भरती करण्या संदर्भात कोणतीच कार्यवाही करण्यात आली नसल्यास विलंबनाची सर्वसाधारण कारणे काय आहेत ?

**श्री. चंद्रशेखर बावनकुळे (१३-०५-२०१५) :** (१) हे खरे नाही.
सद्यस्थितीत बुलढाणा मंडलांतर्गत उच्च दाब १८१ व लघुदाब ५४१८५ अशी एकूण ५४१६६६ एवढी ग्राहक संख्या आहे. बुलढाणा मंडलांतर्गत तांत्रिक कर्मचाऱ्यांची १५४६ हे मंजूर असून १२५० पदे कार्यरत असून २९६ पदे रिक्त आहेत.
(२) हे खरे नाही.
(३) होय.

अभियंता संवर्गातील व तांत्रिक कर्मचाऱ्यांपैकी वर्ग ४ ची प्रारंभी पदे भरतीबाबत भरती प्रक्रिया सुरु आहे. इतर वर्ग ३ व ४ च्या तांत्रिक कर्मचाऱ्यांची पदे पदोन्नती द्वारे भरण्याबाबत बुलढाणा मंडलास आदेशीत करण्यात आले आहे.
(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

**चिखली तालुक्यातील मौजे उंद्री व पेठ येथील परीसरात विद्‌युत ग्राहकांची संख्या तसेच वाहीणी रोहित्राची संख्या मोठ्या प्रमाणावर वाढल्याबाबत**

**(१३) १०३८८ (०४-०४-२०१५). श्री. राहुल बोंद्रे (चिखली) :** सन्माननीय **ऊर्जा मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) चिखली तालुक्यातील मौजे उंद्री व पेठ येथील परीसरात विद्‌युत ग्राहकांची संख्या तसेच वाहीणी रोहित्राची संख्या मोठ्या प्रमाणावर वाढल्याने, विद्‌युत वितरण कंपनीने गेल्या ३ वर्षापूर्वी नविन उपकेंद्र होण्यासंदर्भात रितसर प्रस्ताव शासनाकडे सादर केला असल्याचे माहे नोव्हेंबर, २०१४ रोजी वा त्या सुमारास निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, आराखड्यामध्ये मौजे उंद्री व मौजे पेठ येथे नविन विद्‌युत उपकेंद्र सुरु करण्यासाठी समाविष्ट करण्यात येणार आहे, हे खरे आहे काय,
(३) असल्यास, अद्यापपर्यंत समाविष्ट करण्यात आला नसल्यास नविन विदयेत केंद्र केव्हा व किती दिवसात समाविष्ट करण्यात येणार आहे करणार,
(४) नसल्यास विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. चंद्रशेखर बावनकुळे (२९-०५-२०१५) :** (१) होय.
(२) केंद्र शासनाने प्रस्तावित केलेल्या दिनदयाल उपाध्याय ग्रामज्योती योजनेमध्ये मौजे ऊंद्री व पेठ येथे ३३/११ केव्ही नविन उपकेंद्र समाविष्ट करुन प्रस्ताव केंद्र शासनास पाठविण्यात येणार आहे.
(३) प्रश्न उद्‌भवत नाही.
(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

**शिवना (जि.औरंगाबाद) येथील बसस्थानकावर बांधण्यात आलेले व्यापारी गाळे सध्या अतिक्रमणाच्या विळख्यात सापडले असल्याबाबत**

**(१४) १०३९७ (०७-०४-२०१५). श्री. अब्दुल सत्तार (सिल्लोड) :** सन्माननीय **ग्रामविकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) शिवना (जि.औरंगाबाद) येथे जिल्हा ग्रामीण विकास यंत्रणेच्या मुलभुत सुविधा योजनेअंतर्गत शिवना (ता.सिल्लोड) येथील बसस्थानकावर सन १९९८ मध्ये बांधण्यात आलेले व्यापारी गाळे सध्या अतिक्रमणाच्या विळख्यात सापडले असल्याचे माहे जानेवारी, २०१५ मध्ये वा त्या सुमारास निदर्शनास आले अहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, दारिद्र्यरेषेखालील बेरोजगारांना रोजगार मिळावा यासाठी तत्कालीन लोकप्रतिनिधीनीच्या प्रयत्नातून गाळ्याचे बांधकाम झाले असून बारा वर्षापासून गाळ्यांचे हस्तांतरण रखडले असून थोड्याच महिन्यापूर्वी बचतगटांना दरमहा पंधराशे रुपये भाडेतत्वावर गाळ्यांचे हस्तांतरण झाले परंतू सदरहू बहुंतंशी महिला बचतगटांनी हे गाळे चक्क तीन हजार रुपये प्रतिमाह भाडेतत्वावर खासगी व्यावसायिकांना दिले असून या व्यापा-यांनी गाळ्यांसमोरील जागेवर पत्र्यांचे शेड टाकून इतरक व्यावसायिकांना हे गाळे व समोरील मोकळी जागा भाड्याने दिली यामुळे या परिसराला बकाळ अवस्था प्राप्त झाली आहे, हे पाहता शासन त्वरीत आवश्यक कार्यवाही करणार वा करीत आह काय,
(३) नसल्यास, यामागील विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्रीमती पंकजा मुंडे (१६-०५-२०१५) :** (१) होय.
(२) शिवना ग्रामपंचायत मार्फत मुलभूत सुविधा योजनेअंतर्गत बांधकाम केलेले दुकान गाळ्याचे हसतांतरण रखडलेले नसून ते ग्रामपंचायतीच्या ताब्यात होते. दिनांक १५/२/२०१० रोजी २, दिनांक १८/१/२०११ रोजी १, दिनांक ३/५/२०१२ रोजी ३, व दिनांक ३०/४/२०१२ रोजी ४ असे एकूण १० दुकान गाळे वाटप केलेले आहे. सदरील दुकानगाळे भाडे तत्वावर बचत गटांना दिलेले असून बचत गटाने खाजगी व्यावयायीकांना दिलेले नाही. बचत गटाच्या माध्यमातून सदर दुकान गाळ्यात व्यवसाय सुरु आहे. तेसच दुकान गाळ्यासमोरील जागेवर टाकले पत्राचे शेड ग्रामपंचायत मार्फत दिनांक ३/४/२०१४ रोजी हटविण्यात आले आहे. अतिक्रमण हटविल्यामुळे सदरील दुकान गाळ्याजवळीत परिसर मोकळा झालेला आहे. गाळ्यासमोरील मोकळी जागा कोणालाही भाड्याने दिलेली नाही.
(३) प्रश्न उद्भवत नाही.

---

**मौजे माळशेंबा (ता.चिखली, जि.बुलढाणा) येथे राष्ट्रीय ग्रामीण पेयजल योजने अंतर्गत नळ योजनेचे थकित वीज देयकाचा भरणा करण्याबाबत**

**(१५) १०४०८ (०७-०४-२०१५). श्री. राहुल बोंद्रे (चिखली) :** सन्माननीय **पाणीपुरवठा आणि स्वच्छता मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) मौजे माळशेंबा (ता.चिखली, जि.बुलढाणा) येथे राष्ट्रीय ग्रामीण पेयजल योजने अंतर्गत नविन नळ योजनेचे काम पुर्ण झालेले आहे, परंतु वीज वितरण कंपनीकडून जुन्या नळ योजनेचे थकीत बिल भरणा केल्याशिवाय वीज जोडणी केली जाणार नाही असे सांगण्यात आल्यामुळे, योजनेचे काम पुर्ण झालेले असतांना सुध्दा सदर योजनेचा लाभ गावक-यांना मिळत नसल्याचे माहे जानेवारी, २०१५ मध्ये वा त्या दरम्यान निदर्शनास आले, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, मौजे माळशेंबा ग्रामपंचायतीच्या पुर्वीच्या नळ योजनेच्या थकीत वीज बिलाची रक्कम जास्त असल्यामुळे सदर ग्रामपंचायत बिल भरण्यास सक्षम नाही, त्यासाठी

शासनाकडून थकीत वीज बिल भरणा करण्यासाठी तरतूद करण्यात येणार आहे काय, तरतूद केली जाणार असल्यास केंव्हा व किती दिवसात करण्यात येणार आहे,
(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. बबनराव लोणीकर (१३-०५-२०१५) :** (१) होय, हे खरे आहे.
(२) मौजे माळशेंबा, ता.चिखली येथे राष्ट्रीय ग्रामीण पेयजल योजनेअंतर्गत पूर्ण झालेल्या नवीन नळ पाणीपुरवठा योजनेच्या अंदाजपत्रकात नवीन वीज जोडणीसाठी रु.१,५०,०००/- इतकी तरतुद करण्यात आली आहे. पूर्वीच्या नळ योजनेच्या थकित विज बिलाचा भरणा करण्याकरिता, अंदाजपत्रकात तरतुद करता येत नाही.
(३) ग्रामपंचायतीच्या पूर्वीच्या नळ योजनेच्या थकित वीज बिलाची रक्कम भरण्याची जबाबदारी ही संबंधित ग्रामपंचायतीची आहे.

---

**महाराष्ट्र राज्य सहकारी संघाने नागरी सहकारी पगारदारी संस्थांकडून मोठ्या प्रमाणात शिक्षण निधी वसूल करुन त्याप्रमाणात पतसंस्थेच्या प्रशिक्षणावर खर्च केला नसल्याबाबत**

**(१६) १०४०९ (०९-०४-२०१५). श्री. राहुल बोंद्रे (चिखली) :** सन्माननीय **सहकार मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) महाराष्ट्र राज्य सहकारी संघाने गेल्या अनेक वर्षापासून नागरी सहकारी पगारदारी संस्थांकडून मोठ्या प्रमाणात शिक्षण निधी वसूल करुन त्याप्रमाणात पतसंस्थेच्या प्रशिक्षणावर खर्च केला नसल्याने माहे डिसेंबर, २०१५ मध्ये वा त्या दरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,
(२) महाराष्ट्र राज्य सहकारी संघाची वसुली थांबविण्याचे दृष्टीने काही पतसंस्थेनी केलेल्या दाव्या संबंधी सहकार न्यायालय कोपरगांव यांनी अशा प्रकारची वसुली करण्यास महाराष्ट्र राज्य सहकारी संघाला तुर्तास मनाई करण्याचा आदेश दिला आहे, हे ही खरे आहे काय,
(३) तदनुसार चुकीच्या पध्दतीने व अयोग्य कारणासाठी खर्च केलेली रक्कम वसुल केलेल्या पतसंस्थेला परत करण्याबाबत कोणती कार्यवाही करण्यात आली वा येत आहे,
(४) पतसंस्थेकडून वसुल केलेली रक्कम परत करणार असल्यास किती दिवसात व केव्हा परत करणार, नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत व सदरहू रक्कम किती कालावधीत व केव्हा परत करण्यात येणार आहे ?

**श्री. चंद्रकांत पाटील (१४-०५-२०१५) :** (१) महाराष्ट्र राज्य सहकारी संघ या राज्य स्तरीय संघीय संस्था महाराष्ट्र सहकारी संस्था अधिनियम १९६० चे कलम ६८ नुसार शासनाने दि. १३.४.१९७२ च्या आदेशाने अधिसूचित केले असून नियम ५३ अनुसार विहीत दराने शिक्षण निधी संकलित केलेला आहे.

सदर निधी संघचे उद्दिष्टानुसार नागरी/कर्मचारी पगारदार पतसंस्थांसह इतर सर्व प्रकाराच्या सहकारी संस्थांचे शिक्षण/प्रशिक्षण, प्रचार व प्रसिध्दीचे उद्दिष्ट पूर्तीसाठी खर्चीत पडलेला आहे.

(२) महाराष्ट्र राज्य सहकारी संघाची शिक्षण निधी वसूली थांबविण्याचे दृष्टीने सहकार न्यायालय कोपरगांव यांचेकडे पतसंस्थेने दावा (वाद) क्रमांक एबी.नं.४९०/२०१० दाखल केला होता हे खरे आहे. परंतु सदर न्यायालयाने वादी संस्थेस रु. २०००/- कॉस्ट (दंड) रकमेसह दावा दि. २५.१.२०११ रोजी फेटाळला आहे.

(३) प्रश्न उद्भवत नाही.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

**राज्यातीलऔद्योगिक धोरणाला चालना देण्याबरोबरच राज्यात जलसाठ्याची उपलब्धता जाणून अनुरुप कृषी धोरण आखण्याबाबत**

**(१७) १०४१६ (०४-०४-२०१५). श्री. कुणाल पाटील (धुळे ग्रामीण), प्रा. विरेंद्र जगताप (धामणगाव रेल्वे), ॲड. यशोमती ठाकूर (सोनावणे) (तिवसा), श्री. अमित झनक (रिसोड) :** सन्माननीय **जलसंपदा मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यातील औद्योगिक धोरणाला चालना देण्याबरोबरच राज्यात जलसाठयाची उपलब्धता जाणून अनुरूप असे कृषी धोरण आखण्याच्या दृष्टीकोनातून राज्यातील जिल्हाधिका-यांची महत्त्वपूर्ण बैठक मा.मुख्यमंत्री यांच्या नेतृत्वाखाली दिनांक १७ जानेवारी, २०१५ रोजी वा त्या सुमारास मंत्रालयीन पातळीवर संमत झाली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, राज्यातील पाणी टंचाईच्या भीषण समस्येबाबत उपाययोजना आखणे आणि दुष्काळ मुक्त करण्यासाठी कोणता धोरणात्मक निर्णय फेरविचारांती घेण्यात आला वा येत आहे,

(३) असल्यास, सदर निर्णयाचे स्वरूप व व्याप्ती आणि सद्यःस्थिती काय आहे,

(४) नसल्यास, सदर बाबतीत होत असलेल्या कार्यक्रमात उदासिनता दर्शविणा-या प्राधिका-यांवर कोणती प्रशासकीय व दंडात्मक कारवाई गठीत करण्यात आली वा येत आहे ?

**श्री. गिरीष महाजन (२५-०५-२०१५) :** (१) होय, अंशतः खरे आहे.

दिनांक १७ जानेवारी, २०१५ रोजी मा.मुख्यमंत्री यांच्या अध्यक्षतेखाली पदसिध्द सदस्य असलेले मंत्री व सचिव यांच्यासमवेत राज्य जल परिषदेची पहिली बैठक आयोजित करण्यात आली होती.

(२) व (३) सदर बैठकीत सिंचन विषयक विविध कायद्यामधील सुधारणा व नियम सुधारणांची प्रक्रिया पूर्ण करावी. महाराष्ट्र जलसंपत्ती नियमन प्राधिकरण अधिनियम, २००५ अंतर्गत राज्यातील जलसंपत्तीची विनियमन (Regulation) करण्याची जबाबदारी प्राधिकरणाने पार पाडावी. तसेच, गोदावरी खो-याचा आराखडा राज्य जल मंडळास सादर करावा व उर्वरित खो-यांचे जल आराखडे कालबध्द कार्यक्रम आखून पूर्ण करावेत, असे मा.मुख्यमंत्री तथा अध्यक्ष, राज्य जल परिषद यांनी निर्देश दिलेले आहेत.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

**नांदेड महानगरपालिकेने बी.एस.यु.पी. या योजनेंतर्गत दिलेल्या मोबीलायझेशन अडव्हांस बदल**

**(१८) १०४२५ (०६-०४-२०१५). श्री. सुभाष साबने (देगलूर) :** सन्माननीय **गृहनिर्माण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) नांदेड महानगरपालिकेने बी.एस.यु.पी. या योजनेअंतर्गत कामे करण्यासाठी पंदे कंपनीस दिलेल्या मोबीलायझेशन ॲडव्हांस च्या निधीतून कामे करण्यात आलेली नाहीत, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर कंपनीकडून सदरचा निधी वसूल करण्याची कोणती कार्यवाही करण्यात आली आहे वा करण्यात येत आहे,

(३) असल्यास, उक्त रक्कमेवर सर्वसाधारण सभेच्या ठरावाद्वारे किती टक्के व्याज दर आकारावा अशी शिफारस करण्यात आली आहे,

(४) असल्यास, उक्त पंदे कंपनीकडून सदर रक्कम व्याजासह वसूल करण्याची कोणती कार्यवाही करण्यात आली,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. प्रकाश मेहता (१६-०५-२०१५) :** (१) हे खरे नाही.

(२), (३) व (४) नांदेड-वाघाळा शहर महानगरपालिके अंतर्गत राबविण्यात येणा-या बी.एस.यु.पी.प्रकल्पातील कामांसाठी मे.पंधे इन्फ्राकॉन्स प्रा.लि.सोलापूर या कंपनीस महानगरपालिकेकडून देण्यात आलेला मोबीलायझेशन ॲडव्हान्सची रक्कम व्याजासह, इतर प्रगतीपथावर असलेल्या कामाच्या देयकातून कपात करण्यात येत आहे (एनटीसी मिल येथील प्रकल्प वगळून).

तथापि एनटीसी मिल भागातील प्रकल्पाचे काम जमिनीचे हस्तांतरण होऊ न शकलल्यामुळे सुरु होऊ शकले नही, यामुळे प्रस्तुत प्रकल्पाच्या कामांसाठी कंपनीला दिलेल्या मोबीलायझेशन ॲडव्हान्स वरील व्याज माफ करण्याची विनंती कंपनीने केली आहे. यासंदर्भात महानगरपालिकेच्या सर्वसाधारण सभेने कंत्राटदाराचे व्याज माफ करण्याचा ठराव पारित केला आहे. तसेच मूळ मोबीलायझेशन ॲडव्हान्सची रक्कम इतर कामाच्या देयकातून कपात करण्यात येत आहे.

(५) प्रश्न उद्भवत नाही.

---

**नांदेड जिल्ह्यातील स्वस्त धान्य दुकानातील धान्य व रॉकेलचा काळा बाजार तसेच परराज्यात विक्री होत असतानासुध्दा जिल्हा पुरवठा अधिकाऱ्यांनी केलेले दुर्लक्ष**

**(१९) १०४२९ (०७-०४-२०१५). श्री. सुभाष साबने (देगलूर) :** सन्माननीय **अन्न, नागरी पुरवठा व ग्राहक संरक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) नांदेड जिल्ह्यातील स्वस्त धान्य दुकानातील धान्य व रॉकेल मोठ्या प्रमाणावर राजरोसपणे काळ्या बाजारात व परराज्यात विक्रीसाठी नेत असताना सदर घटनेबाबत जिल्हा पुरवठा अधिकारी यांनी कार्यवाही न केल्यामुळे जिल्हा पुरवठा अधिकारी यांची विविध विभागाकडून उच्चस्तरीय चौकशी करण्यात आली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, संबंधित जिल्हा पुरवठा अधिकाऱ्यांवर कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, त्याची कारणे काय आहेत ?

**श्री. गिरीश बापट (११-०५-२०१५) :** (१) हे खरे नाही,

(२) नांदेड जिल्ह्यात १६४७ इतक्या रास्तभाव दुकानांच्या तपासण्या शासनाच्या मापदंडाप्रमाणे करण्यात आल्या असून, या तपासणीमध्ये दोषी आढळून आलेल्या ९ स्वस्त धान दुकानाचा परवाना रद्द व ११ स्वस्त धान्य दुकानाचे परवाने निलंबित करण्याची कार्यवाही करण्यात आली आहे.

सन २०१४ मध्ये १३८७ केरोसीन परवान्यांच्या तपासण्या करण्यात आल्या. या तपासण्यामध्ये दोषी आढळून आलेल्या १ अर्ध घाऊन केरोसिन परवाना रद्द व ६ किरकोळ केरोसिन परवाना निलंबित करण्याची कार्यवाही करण्यात आली आहे.

क्षेत्रिय अधिकारी/कर्मचारी यांचेकडून रास्तभाव दुकाने/किरकोळ केरोसिन परवाने यांच्या नियमित/ व आकस्मिक तपासण्या करण्यात येतात. तपासणीत दोषी आढळून येणाऱ्या रास्तभाव दुकान/किरकोळ केरोसिन परवानाधारकांविरुध्द दंडाची तसेच परवाना निलंबित अथवा रद्द करण्याची कार्यवाही केली जाते. त्यामुळे सद्य:स्थितीत जिल्हा पुरवठा अधिकाऱ्यांवर कारवाईचा प्रश्न उद्‌भवत नाही.

(३) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

**नांदेड जिल्हा पिरषदेअंतर्गत विशेष हक्क योजनेअंतर्गत झालेल्या**
**सहित्य खरेदीतील गैरव्यवहारप्रकरणी**

**(२०) १०४३१ (०८-०४-२०१५). श्री. सुभाष साबने (देगलूर) :** सन्माननीय **ग्रामविकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) नांदेड जिल्हा परिषदेने सन २०१४-१५ या वर्षाकरीता मागासवर्गीय लाभार्थ्यांना शंभर टक्के अनुदानावर वाटप करण्याचे साहित्य २० टक्के सेस निधीतून खरेदी करताना लाभार्थी निवड करणेपूर्वीच नियमबाह्यपणे साहित्य खरेदी केल्याप्रकरणी चौकशी करुन दोषींवर कारवाई करण्यात आली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, चौकशीचे व कार्यवाहीचे स्वरुप काय आहे,

(३) उक्त प्रकरणी अद्यापी चौकशी झाली नसल्यास शासनाने या प्रकरणी नव्याने चौकशी करणार आहे काय ?

**श्रीमती पंकजा मुंडे (०८-०५-२०१५) :** (१) हे खरे नाही.

नांदेड जिल्हा परिषदेने सन २०१४-१५ या वर्षाकरिता मागासवर्गीय लाभार्थ्यांना १००% अनुदंनावर वाटप करण्याचे साहित्य खरेदी या वैयक्तिक लाभाच्या योजनेअंतर्गत संभाव्य लाभार्थी उपलब्ध असल्यामुळे खरेदी करण्यात आली आहे. खरेदी प्रक्रिया नियमानुसार करण्यत आली असून सदरच्या काळात लाभार्थी नोंदवही उपलब्ध होती.

(२) व (३) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

**सोशल मिडीयाच्या माध्यमातून अफवा पसरवणे तसेच सामाजिक तेढ निर्माण करणे यासारख्या प्रकारात वाढ झाल्याबाबत**

**(२१) १०४५० (०६-०४-२०१५). श्री. नरहरी झिरवाळ (दिंडोरी), श्री. अजय चौधरी (शिवडी) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) सोशल मिडीयाच्या माध्यमातून अफवा पसरवणे तसेच सामाजिक तेढ निर्माण करणे यासारख्या प्रकारात वाढ झाली असल्याचे निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, अशा माध्यमावर नियंत्रण ठेवण्याकरिता शासनाने कोणती उपाय योजना केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (१९-०५-२०१५) :** (१) होय, हे खरे आहे.

(२) राज्यंतील सर्व घटकांमध्ये गुन्ह्यांचा तपास करण्यासाठी सर्वत्र सायबर क्राईम सेल तयार करण्यात आले असून त्यातील ब-याच घटकामध्ये इंटरनेट मॉनेटरिंग सेल कार्यरत असून दिवसा २ व रात्री २ कर्मचारी (नेट वॉचर्स) काम करीत असतात व सदर ठिकाणी आक्षेपार्ह कजकूर आढळलयास ताबडतोड कारवाई केली जाते.

महाराष्ट्र राज्यातील सर्व सायबर कॅफेना त्यांच्याकडे आलेल्या ग्राहकांचे ओळखपत्र, नाव, पत्ता अशा बाबींची माहिति संकलत करण्याबाबत बंधनकारक केले असून त्यांचे उल्लंघन करण्यावरती वेळोवेळी योग्य ती कार्यवाही केली जाते. त्यांच्या देखील मिटींग आयोजित करुन योग्य ती दक्षता देखील मिटींग आयोजित करुन योग्य ती दक्षता घेणेबाबत सुचना देण्यात येत आहेत. सोशल मिडीयांसंदर्भात घडणा-या गुन्ह्यांचा तपास योग्यरितीने व्हावा याकरीता राज्यातील विविध घटकामध्ये पालीस अधिकारी व कर्मचारी यांना तपासाबाबतचे मार्गदर्शना तसेच नवनवीन तंत्रज्ञानाची माहिती देणेसाठी नॅसकॉम, सीडॅक, यासारख्या सॉफ्टवेअर कंपन्यांचे सहकार्य घेवून प्रशिक्षित केले जात आहे.

सोशल मिडीयासंदर्भात घडणा-या गुन्ह्यांची त्वरीत माहिती मिहणेकरीता शाळा, कॉलेज या ठिकाणी भेटी देवून युवकांना माहिती तंत्रज्ञान कायाद कलम ६६ च्या तरतुदींची शिक्षेची सुपुर्ण माहिती देण्यात आली आहे. तसेच प्रक्षोभक लिखाण मजकुर व चित्रे यांचा सोशल मिडीयावर प्रसार न करता ते तात्काळ डिलिट करणेबाबत किंवा रिपोर्ट करणेबाबत युवकांना प्रात्यक्षिकांसह समजावून सांगण्यात आले आहे.

पोलीस घटकातील सायबर सेल मार्फत आक्षेपार्ह पोस्ट डिलीट करण्यासाठी फसेबुकच्या सेटिंगमधून जास्तीत जास्त रिपोर्ट केले जाते. तसेच मोठ्या प्रमाणावर त्वरीत संदेश पाठविण्याकरीता नॅशनल इन्फॉरमेशन सेंटर, नवी दिल्ली याद्वारे बल्म एस.एम.एस. सुविधा कार्यन्वित करण्यात अलेली आहे. CERT IN ईमेलद्वारे माहिती देवून संबंधित वेबसाईटला कळविण्याबाबत तसेच त्याच्या स्तरावर कारवाई करण्यात येते. काही घटकामार्फत वस्तुस्थिती दर्शक, शांततेचे आवाहन करणारे पोस्टर तयार करुन ते फलेक्स, बॅनर पॅम्पलेट द्वारे प्रसिध्दी करण्यात आले आहेत तसेच व्हॉट्स अप, फेसबुक, वेबसाईट, ब्लॉग व एसएमएस याद्वारे

सुध्दा लोकार्पंत पोहचविले, प्रिंट मिडीया , इलेक्ट्रॉनिक मिडीया माध्यमातून जनतेल शांततेचे आवाहन करण्यात आले आहे. तसेच केंद्र शासनाच्या धर्तीवर महाराष्ट्रातही CERT IN ची संस्था स्थापन करणेबाबतची विनंती राज्य शासनाने केंद्र शासनास केली आहे.
(३) प्रश्न उद्भवत नाही.

---

**मुंबईतील चित्रपटनगरीचे सह. व्यवस्थापकीय संचालक**
**यांच्याकडून कामगारांना होत असेलेला त्रास**

**(२२) १०४६६ (०७-०४-२०१५). श्री. नरहरी झिरवाळ (दिंडोरी) :** सन्माननीय **सांस्कृतिक कार्य मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) मुंबईतील चित्रपटनगरीचे सह. व्यवस्थापकीय संचालक हे चित्रपटनगरीतील कामगारांशी अरेरावी, दमदाटी करत असून जीवे मारण्याची धमकी दिल्याप्रकरणी आरे पोलीस ठाण्यामध्ये दिनांक १९ जानेवारी, २०१५ रोजी वा त्यासुमारास तक्रार दाखल केली, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, याबाबत चौकशी केली आहे काय, चौकशीत काय आढळून आले व त्यानुषंगाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत तसेच कामगारांना सुरक्षा देण्यासंदर्भात कोणता पाठपुरावा करण्यात आला वा येत आहे ?

**श्री. विनोद तावडे (१३-०५-२०१५) :** (१) होय.
(२) याबाबत महाराष्ट्र चित्रपट, रंगभूमी आणि सांस्कृतिक विकास महामंडळ यांच्याकडून अहवाल मागविण्यात आला. महामंडळाकडे प्राप्त तक्रारीचे निवारण करण्यासाठी प्रशासकीय शिस्तीचा भाग म्हणून महामंडळ प्रशासनाने त्यांच्या तीन कर्मचा-यांना कार्यालयीन आदेशाद्वारे शिस्तीचे पालन करण्याच्या सूचना दिल्या. या कार्यवाहीस अनुलक्षून दोन कर्मचाऱ्यांनी कार्यालयीन आदेशाचे पालन केले. मात्र तिस-या कर्मचा-याने विरोध केला. या कर्मचा-याने दिलेल्या सूचनांचा गैरसमज करुन घेऊन प्रशासनावर दबाव आणण्याच्या दृष्टीकोनातून पोलीस ठाण्यात तक्रार केली. पोलीसांनी अदखलपात्र गुन्हा दाखल केला आहे.

हे प्रकरण ताणतणावाच्या परिस्थितीत निर्माण झालेल्या गैरसमज व विपर्यासामुळे उपस्थित झाले आहे. कर्मचा-यांना प्रशासकीय शिस्त/नियम/कार्यपध्दतीचे पालन करण्याचे निदेश देणे, सुनियंत्रित प्रशासनाकरिता आवश्यक आहे. मात्र असे करताना जर एखादा कर्मचारी प्रशासकीय आदेशाचे पालन करीत नसेल व दबाव आणण्यासाठी पोलीस तक्रार करण्याची कृती करीत असेल तर, प्रशासकीय अधिका-यांना यासाठी जबाबदार धरणे उचित ठरणार नाही. यास्तव या प्रकरणी पोलीस तक्रारीस अनुलक्षून सह. व्यवस्थापकीय संचालकांविरुध्द कार्यवाही करण्याची आवश्यकता नाही.
(३) कार्यवाही करण्याची आवश्यकता नाही. सह.व्यवस्थापकीय संचालक तीन वर्षे महामंडळात कार्यरत होते. त्यांच्याविरुध्द यापूर्वी कोणीही तक्रार केलेली नाही. तसेच त्यांची कार्यपध्दती

कर्मचारी विरोधी किंवा कामगारांना असुरक्षित करणारी कधीही नव्हती. सबब, कर्मचा-यांच्या असुरक्षिततेचा प्रश्नच उपस्थित होत नसल्याने याबाबत कोणताही पाठपुरावा करण्याची आवश्यकता नाही.

आता त्यांचा महामंडळातील प्रतिनियुक्ती कालावधी संपला असल्याने त्यांच्या सेवा त्यांच्या मूळ विभागाला परत करण्यात आल्या आहेत.

---

**नाशिक जिल्ह्यातील उपसासिंचन योजना गैरव्यवहाराबाबत**

**(२३) १०४६९ (०७-०४-२०१५). श्री. नरहरी झिरवाळ (दिंडोरी) :** सन्माननीय **जलसंपदा मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) नाशिक जिल्ह्यातील उपसा सिंचन योजना २ व ३ मधील सर्वेक्षणामध्ये झालेल्या गैरव्यवहाराची चौकशी अधिक्षक अभियंता, दक्षतापथक, पाटबंधारे विभाग, मुंबई परिमंडळ, ठाणे मार्फत सुरू असलेली चौकशी पुर्ण झालेली आहे काय, असल्या उक्त प्रश्नी चौकशीत काय आढळून आले व त्यानुसार आता पर्यंत काय कारवाई करण्यात आली,

(२) नसल्यास, सदर प्रश्नी चौकशी पूर्ण झालेली नसल्यास त्याची सर्वसाधारण कारणे काय,

(३) तसेच, सदरचा अहवाल लवकरात लवकर प्राप्त करण्याकरीता कोणता पाठपुरावा करण्यात आला आहे ?

**श्री. गिरीष महाजन (०८-०५-२०१५) :** (१) दक्षता पथक, ठाणे यांचेकडून प्राथमिक अन्वेषण अहवाल दि. १७/०४/२०१५ रोजी प्राप्त झाला आहे. सर्वेक्षणाच्या कामाच्या निविदा प्रक्रियेत अनियमितता झाल असल्याच्या निष्कर्ष सदर अहवालात नमूद करण्यात आला आहे. प्रथमिक चौकशी पूर्ण झाली आहे. सवेक्षण कामांच्या निविदा प्रक्रियेत काही अनियमितता झाल्याचे निदर्शनास आले आहे. त्यानुषंगाने पुढील कार्यवाही प्रगतीत आहे.

(२) प्रश्न उद्‌भवत नाही.

(३) शासनपत्र दि.०९/०९/२०१४, ०४/१२/२०१४ व दि. ०७/०४/२०१५ अन्वये प्राथमिक चौकशी अहवाल तातडीने सादर करण्याबाबत अधीक्षक अभियंता, दक्षता पथक, ठाणे यांना कळविण्यात आले होते.

---

**सिंचन अनुशेषांतर्गत घेण्यात येणा-या अमरावती जिल्ह्यातील ६९ सिंचन प्रकल्पांचे काम मागील तीन वर्षापासून भुसंपादन न झाल्यामुळे रखडले असल्याबाबत**

**(२४) १०४८४ (०७-०४-२०१५). श्री. बच्चू कडू (अचलपूर) :** सन्माननीय **जलसंपदा मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) सिंचन अनुशेषांतर्गत घेण्यात येणा-या अमरावती जिल्ह्यातील ६९ सिंचन प्रकल्पांचे काम मागील तीन वर्षापासून भुसंपादन न झाल्याने अडलेले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, ही कामे पुर्ण करण्याचे उद्दिष्ट ठरलेले असताना अद्यापपर्यंत भुसंदान व संयुक्त मोजणीची कामेही पूर्ण झालेले नाहीत, हे खरे आहे काय,
(३) असल्यास, निधीची अपुरी तरतुद आणि प्रशासकीय दिरगांई यामुहे हे सिंचन प्रकल्प सुरु झालेल नाहीत, हे खरे आहे काय,
(४) असल्यास, २०१६ पर्यंत हे प्रकल्प पुर्ण व्हावेत यासाठी शासन कास उपाययोजना करणार आहेत ?

**श्री. गिरीष महाजन (०१-०६-२०१५) :** (१) अंशतः खरे आहे. अमरावती जिल्ह्यात अनुशेषा अंतर्गत ३३ बांधकामाधीन प्रकल्प आहेत. त्यापैकी प्रकल्पाचे भूसंपादन पुर्ण झालेले आहे. जनुना (खं) ल.पा. योजना जलसंधारण विभागाकडे हस्तांतरीत करण्यात आलजी आहे. उर्वरित प्रकल्पांची कामे भूसंपादनाअभावी अपूर्ण आहेत.
(२) एकूण ४८३०.८३ हे. क्षेत्राची ३६३ प्रकरणे जिल्हाधिकारी यांना सादर करण्यात आलेली आहेत. त्यापैकी ४७ ३.४४ हे क्षेत्राचे ६५ प्रकरणी निवाडा घोषित झालेला आहे. एकूण ९० प्रकरणी सुयुक्त मोजणी पुर्ण झालेली नाही. इतर प्रकरणे भूसंपदानाच्या विविध टप्प्यावर प्रगतीत आहेत.
(३) नाही.
(४) सदर प्रकल्पांची कामे जून, २०१८ पर्यंत पूर्ण करण्याचे नियोजन केले आहे. भूसंपादन प्रक्रियेस गती देणेसाठी दि.१२ मे, २०१५ रोजी शासनाने खाजगी वाटाघाटीद्वारे थेट जमिन खरेदी करणेबाबतचा निर्णय घेतला आहे.

---

**राज्यातील अपंगांच्या विविध मागण्यांबाबत**

**(२५) १०५०२ (१०-०४-२०१५). श्री. बच्चू कडू (अचलपूर) :** सन्माननीय **सामाजिक न्याय मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) राज्यातील अपंगांच्या विविध मागण्यासाठी करण्यात आलेल्या आंदोलन प्रसंगी ज्या मागण्या मान्य करण्याचे आश्वासन शासनाने दिले, त्या आश्वासनांची पुर्तता करण्यात यावी अशी मागणी सदर लोकप्रतिनिधींनी दिनांक ७ जुलै, २०१४ रेजी मा.मंत्री, सामाजिक न्याय यांचेकडे केली, हे ख्रे आहे काय,
(२) असल्यास, ९ जानेवारी, २०१३ तसेच २ व ४ फेब्रुवारी, २०१३ रोजी झालेल्या आंदोलनाच्या वेळी देण्यात आलेल्या आश्वासनांची पुर्तता होण्यास विलंब होण्याची कारणे काय आहेत,
(३) शासन या संदर्भात काय कार्यवाही करणर आहे ?
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. राजकुमार बडोले (२७-०५-२०१५) :** (१) होय, हे खरे आहे.
(२), (३) व (४) संबंधित लोकप्रतिनिधी यांनी दि.९ जानेवारी, २०१३ तसेच दि.२ व ३ फेब्रुवारी, २०१३ रोजी केलेल्या आंदोलनाच्या वेळी देण्यात आलेल्या आश्वासनांच्या अनुषंगाने खालीलप्रमाणे कार्यवाही करण्यात आलेली आहे :-

१) शासकीय व अनुदानित वसतीगृहांमध्ये अपंगांच्या ३% जागा पूर्णपणे भरणे व अपंगांना सर्व सोयी सुविधा पुरविणेबाबत दि.१९/१०/२०१३ च्या शासन परिपत्रकान्वये सूचना देण्यात आलेल्या आहेत.

२) आंतरजातीय विवाहाच्या धर्तीवर अपंग-अव्यंग विवाहित अपंगांना विशेष सहाय्य देण्याबाबतचा शासन निर्णय दि.१७ जून, २०१४ रोजी निर्गमित करण्यात आलेला आहे.

३) अपंग विदयार्थ्यांच्या शिष्यवृत्तीमध्ये वाढ करण्याबाबतचे आदेश दि.३० ऑगस्ट, २०१४ रोजी निर्गमित करण्यात आलेले आहेत.

४) संजय गांधी निराधार अनुदान योजना समितीवर अपंगांना प्राधान्य देण्याबाबतचा शासन निर्णय दि.२१ जानेवारी, २०१४ रोजी निर्गमित करण्यात आलेले आहेत.

५) अपंगांच्या शाळांच्या अनुज्ञाप्ती नुतनीकरणाबाबत दिनांक २४ जानेवारी, २०१४ रोजी हस्तांतर स्थलांतरणाच्या शासन निर्णयान्वये नुतनीकरणाचा कालावधी निश्चित करण्यात आलेला आहे.

६) इतर काही मागण्या विविध मंत्रालयीन विभागांशी संबंधित असून, संबंधित विभागांकडून गृहनिर्माण प्रकल्पात असलेले २% आरक्षण ३% करणे, जन्म नोंदवहीत अपंगांची स्वतंत्र नोंद करणे, इंदिरा आवास योजनेमध्ये अपंगांना प्राधान्य देणे इत्यादीबाबत शासन अधिसूचना, शासन निर्णय, परिपत्रके निर्गमित करण्यात आलेली आहेत.

७) तसेच शासन सेवेतील इतर अपंग कर्मचा-यांप्रमाणे मुक-बधीर कर्मचा-यांनादेखील विशेष वाहन भत्ता लागू करणेबाबत वित्त विभागाकडून कार्यवाही सुरु आहे.

८) अपंग कल्याण आयुक्तालयाचे बळकटीकरण करणे, संजय गांधी निराधार अनुदान योजनेच्या उत्पन्न मर्यादेत वाढ करणे इत्यादीबाबत या विभागाकडून कार्यवाही सुरु आहे.

९) त्याचप्रमाणे जन्म नोंदवहीत अपंगांची स्वतंत्रपणे नोंद ठेवण्याबाबत निर्गमित केलेल्या शासन निर्णयाची अंमलबजावणी संबंधित संस्थांकडून होत नसल्याबाबत नगर विकास विभाग व ग्रामविकास विभाग या विभागांना दिनांक १८/०७/२०१४ च्या पत्रान्वये कार्यवाही करण्याबाबत कळविण्यात आलेले आहे.

---

## बिबट्याला पकडण्यासाठीचा उपाय म्हणून त्यास भूल देण्याच्या औषधांचा असलेला तुटवडा

**(२६) १०५२९ (०७-०४-२०१५). श्री. बाळासाहेब थोरात (संगमनेर) :** सन्माननीय **वने मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) अहमदनगर जिल्ह्यात सर्वत्र बिबट्यांचा मुक्त संचार सुरु असून त्यांचा उपद्रव नागरीक व शेतकरी यांना होतो, अशावेळी बिबट्याला पकडण्यासाठीचा एक उपाय म्हणून त्यास भूल देण्याचे औषध जिल्ह्यात कोठेही उपलब्ध नाही, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, बिबटयास भूल देण्यासाठीचे औषध नसल्याने त्यास पकडण्यात किती प्रकरणात अपयश आले व ही औषधे कधी पासून शिल्लक नाहीत,

(३) असल्यास, चालू आर्थिक वर्षात असे अपयश येण्यापूर्वी व नंतर किती मानवी जिवांना याचा त्रास झाला व त्यांना किती मदत देण्यात आली ?

**श्री. सुधीर मुनगंटीवार (३०-०५-२०१५)** : (१) व (२) अहमदनगर जिल्ह्यात अहमदनगर वनविभाग व संगमनेर उपविभागाचा समावेश होतो. मुळा, प्रवरा व म्हाळुंगी नद्यांच्या काठावरील ऊस बागायती शेतमध्ये बिबट्यांचे आश्रय स्थान असल्याचे निदर्शनास आले आहे.

बिबट्याला पकडण्यासाठीचा एक उपाय म्हणून त्यास भूल देण्याचे औषध अहमदनगर वनविभाग व संगमनेर उपविभागाकडे आवश्यक प्रमाणात उपलब्ध आहे भूल देण्याचे औषध नसल्याने बिबट्याला पकडण्याचे प्रकरणात अपयश आले असे झालेले नाही.

(३) अहमदनगर जिल्ह्यात सन २०१४-१५ मध्ये बिबट्याच्या हल्ल्यात ९ व्यक्ती जखमी तर १ व्यक्ती मृत्यू झाल्याच्या घटना घडल्या असून शासन निर्णयाच्या तरतूदीनुसार जखमी व्यक्तीस एकूण रु.२,४०,६७३ व मृत व्यक्तीच्या कायदेशीर वारसास रु.५.०० लाख नुकसान भरपाई अदा करण्यात आली आहे.

---

## ग्रामपंचायत निवडणुकीसाठी उमेदवंरी अर्ज दाखल करतांना नामनिर्देशन पत्रासोबत जात प्रमाणपत्र जोडण्याची अट शिथिल करण्यबाबत

**(२७) १०५४५ (०७-०४-२०१५). श्री.बाळासाहेब थोरात (संगमनेर), श्री.सुनिल प्रभू (दिंडोशी), श्री.रुपेश म्हात्रे (भिवंडी पूर्व), श्री.मनोहर भोईर (उरण), श्री.अर्जुन खोतकर (जालना), श्री.अजय चौधरी (शिवडी), श्री.अनिल बाबर (खानापूर), श्री.जयकुमार गोरे (माण) :** सन्माननीय **ग्रामविकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) ग्रामपंचायत निवडणुकीसाठी उमेदवारी अर्ज दाखल करतांना नामनिर्देशन पत्रासोबत जात प्रमाणपत्र जोडण्यंची अट शिथिल करण्याचे प्रस्तावित आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उमेदवारी अर्ज भरल्यानंतर विशिष्ट कालावधीत जातीचा दाखला सादर करण्याची अट राहणार असल्याचे प्रस्तावित आहे, हे खरे आहे काय,

(३) वरील प्रस्ताव करण्याऐवजी इच्छुक उमेदवारांनी नामनिर्देशनपूर्वीच जात प्रमाणपत्र उपलब्ध करुवून घ्यावेत यासाठी काही नियोजन केल आहे का व असल्यास त्याची व्याप्ती काय आहे ?

**श्रीमती पंकजा मुंडे (१५-०५-२०१५)** : (१) व (२) ग्रामपंचायत निवडणुकांसाठी राखीव प्रवर्गतुन निवडणुक लढविणा-या उमेदवारांसाठ जातवैधता प्रमाणपत्र सादर करण्यास, निवडून आल्याच्या दिनांकापासून सहा महिन्यांची मुदतवाढ देण्यात आली आहे. ही मुदतवाढ दि.३१ डिसेंबर, २०१५ रोजीपर्यंत होणा-या ग्रामपंचायत निवडणुकांसाठी लागू राहणार आहे.

यासंदर्भात, दि.२६ मार्च, २०१५ रोजी अधिसूचना निर्गमित केली आहे.

(३) प्रश्न उद्भवत नाही.

---

**भातसा कालवा विभाग क्र.१ यांचे कार्यालय स्थलांतरित करण्याचा शासनाने निर्णय घेतल्याबाबत**

**(२८) १०५८९ (०७-०४-२०१५). श्री.पांडुरंग बरोरा (शहापूर), श्री. रमेश कदम (मोहोळ), श्री. जितेंद्र आव्हाड (मुंब्रा कळवा) :** सन्माननीय **जलसंपदा मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) भातसा कालवा विभाग क्र.१ यांचे कार्यालय ठाणे जिल्ह्यातील शहापूर येथे आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, हे कार्यालय आता पालघर (जि.पालघर) येथे स्थलांतरित करण्याचा शासनाने निर्णय घेतला आहे हे ही खरे आहे काय, असल्यास, त्याची कारणे काय,

(३) शहापूर मुख्यालय असून मध्यवर्ती ठिकाणी असल्यामुळे तेथील नागरिकांच्यादृष्टीने सोयीचे आहे त्यामुळे भातसा कालवा विभाग क्रमांक १ हे कार्यालय शहापूर येथेच ठेवण्याबाबत तेथील शेतकऱ्यांनी व संबंधित लोकप्रतिनिधींनी दिनांक २७ जानेवारी, २०१५ रोजी मा.जलसंपदा मंत्री यांचेकडे लेखी निवेदनाव्दारे मागणी केली आहे, हे खरे आहे काय,

(४) असल्यास, या मागणीवर शासनाने कोणता निर्णय घेतला वा घेण्यात येत आहे ?

**श्री. गिरीष महाजन (२२-०५-२०१५) :** (१) होय.

(२) नाही.

(३) दि. २७ जानेवारी, २०१४५ पूर्वी व यानंतर लोकप्रतिनिधी यांनी भातसा कालवा विभाग क्र.१ शहापूर हे विभागीय कार्यालय शहापूर येथेच कार्यरत ठेवण्याबाबत मा.मंत्री (जलसंपदा) यांना विनंती केली आहे.

(४) कोकण पाटबंधारे विकास महामंडळ, ठाणे यांचेकडून दिनांक १०.०४.२०१५ रोजी सुधारित प्रस्ताव सादर केला असून, प्रस्तावासंदर्भात शासनाने अद्‌याप निर्णय घेतलेला नाही.

---

**राज्यातील अतिरिक्त जंगल भागात इको-टूरिझम राबविण्याबाबत**

**(२९) १०५९१ (०६-०४-२०१५). श्री.पांडुरंग बरोरा (शहापूर), श्री.रमेश कदम (मोहोळ), श्री.जितेंद्र आव्हाड (मुंब्रा कळवा), श्री. सुरेश धानोरकर (वरोरा) :** सन्माननीय **वने मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यातील अतिरिक्त जंगल भागात इको-टूरिझम राबविण्यात येणार आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, जंगल भागात इको-टूरिझम राबवून आर्थिक स्तर वाढविणे नैसगिक साधनसंपत्तीचे संवर्धन व्हावे, त्याची नागरिकांना माहिती व्हावी, याकरिता सदर प्रकरणी कोणता निर्णय घेतला व घेण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. सुधीर मुनगंटीवार (३०-०५-२०१५) :** (१) सन २०१५-१६ पासून निसर्ग पर्यटन व वन पर्यटन या दोन्ही योजना एकत्रित करण्यात आल्या आहेत. अभयारण्य अभयारण्याला जोडून असलेले क्षेत्र व अभयारण्य नसलेल्या वन क्षेत्रात सदर योजना राबविण्यात येत आहे.

(२) सन २०१४-१५ मध्ये निसर्ग पर्यटन या योजनेतंर्गत अभयारण्य, अभयारण्याला जोडून असलेले क्षेत्र व अभयारण्य नसलेल्या वन क्षेत्रात आदिवासी कुटूंबाचे घरकुल, रहिवास, पर्यटन, वन विश्राम गृह, पर्यवरण संतुलित करणे (सौरउर्जा), वन पर्यटकांना संकेत स्थळावरुन आरक्षण व्यवस्था करणे, फलक लावणे, सांडपाणी प्रक्रिया करणे इत्यादी सुविधा पुरविण्यात आल्या असून परिसर विकास समितील वन पर्यटन निर्माण करण्यासाठी अनुदान उपलब्ध करुन दिले आहे.

सन २०१५-१६ मध्ये या योजनेसाठी रु.३५.७० लक्ष इतका निधी अर्थसंकल्पीत करण्यात आला आहे.

(३) प्रश्न उद्भवत नाही.

---

## ठाणे जिल्ह्यातील तानसा अभयारण्यांमध्ये निसर्ग पर्यटन विकास प्रकल्प राबविण्यासाठी वन्यजीव विभागाने आदिवासी विकास विभागाकडे पाठविलेला प्रस्ताव

**(३०) १०५९६ (०७-०४-२०१५). श्री.पांडुरंग बरोरा (शहापूर), श्री.रमेश कदम (मोहोळ), श्री.जितेंद्र आव्हाड (मुंब्रा कळवा) :** सन्माननीय **वने मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) ठाणे जिल्ह्यातील तानसा अभयारण्यांमध्ये निसर्ग पर्यटन विकास प्रकल्प राबविण्यासाठी वन्यजीव विभागाने आदिवासी विकास विभागाकडे माहे जानेवारी, २०१५ च्या तिस-या आठवड्यात प्रस्ताव पाठविलेला आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उक्त प्रश्नी पाठविलेल्या प्रस्तावाचे थोडक्यात स्वरुप काय आहे व त्यानुसार आतापर्यंत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(३) उक्त प्रश्नी उद्याप कोणतीही कार्यवाही केलेली नसल्यास त्याची सर्वसाधारण कारणे काय आहेत तसेच सदर प्रस्तावास मान्यता देण्यासंदर्भात आतापर्यंत कोणता पाठपुरावा केला वा करण्यात येत आहे ?

**श्री. सुधीर मुनगंटीवार (३०-०५-२०१५) :** (१) व (२) तानसा वन्यतीव अभयारणामध्ये नैसग्रिक धबधबे दीर्घकाळ चालू राहून वन्यजीव पक्ष्यांना पाणी उपलब्ध व्हावे तसेच पर्यटकांना आकर्षित करणेसाठी वन बंधारे बांधणेक, चेकडॅम बांधणे, वॉटर होल तयार करणे, हॉरमेटरी कॅबीन खरेदी करणे धबधब्याच्या ठिकाणी लोखंडी जाळीचे कामे करणे इत्यादीचा प्रस्ताव केंद्रस्थ अधिकारी तथा उपवनसंरक्षक, ठाणे यांचेमार्फत जिल्हा वार्षिक योजनेअंतर्गत माहूली गड निसर्ग पर्यटन माहे डिसेंबर, २०१४ व माहे फेब्रुवारी, २०१५ अशा दोन टप्प्यांमध्येजिल्हाधिकारी, ठाणे यांना सादर कारण्यात आला होता. तसेच सहाय्यक वनसंरक्षक, जंकास शहापूर यांनी तानसा व

बोराळा ग्राम परिस्थितीकिय विकास समितीमार्फत जलविहार नौका, निसर्ग वाचन केंद्र दुरुस्ती व बंदिस्त मस्य पालन व VEDC बळकटी करण इ. कामे वनपर्यटन व आदिवासी विकास कामाचा प्रज्ञतव आदिवासी विकास विभगामार्फत जिल्हाधिकारी यांना पाठविण्यात आला होत त्यास जिल्हाधिकारी यांनी मंजूरी प्रदान केली आहे.
(३) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

**पालघर जिल्ह्यातील जव्हार तालुक्यातील डोमिहिरा धरणाचे काम निकृष्ट दर्जाचे झाल्याबाबत.**

**(३१) १०६०५ (०७-०४-२०१५). श्री. पांडुरंग बरोरा (शहापूर), श्री. रमेश कदम (मोहोळ), श्री.जितेंद्र आव्हाड (मुंब्रा कळवा) :** सन्माननीय **जलसंपदा मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) पालघर जिल्ह्यातील जव्हार तालुक्यातील डोमिहिरा धरणाचे काम निकृष्ट दर्जाचे झाले आहे, हे खरे आहे काय,
(२) तसेच, या धरणावर किती खर्च करण्यात आला आहे,
(३) असल्यास, धरणग्रस्तांचे पुनर्वसन कासटवाडी (आसरानगर) येथे करण्यात आले असून त्याठिकाणी नळयोजना, समाजमंदीर, स्मशानभूमी इत्यादी सुविधा पुरविण्यात आल्या नाहीत, हे ही खरे आहे काय,
(४) असल्यास, त्याची कारणे काय आहेत ?

**श्री. गिरीष महाजन (०२-०६-२०१५) :** (१) अंशतः खरे आहे, डोमिहिरा धरण हे माती धरण असून त्यातून गळती नाही. सांडव्याच्या दगडी बांधकामातून गळती आढळून आली आहे.
(२) धरणकामावर मार्च, २०१५ पर्यंत रु.६९.९५ कोटी इतका खर्च झालेला असून प्रकल्पावर एकूण रु.९८.३४ कोटी इतका खर्च झालेला आहे.
(३) व (४) नाही, प्रकल्पग्रस्तांनी स्वेच्छा पुर्नवसन घेतलेले असून त्यांना कासटवाडी येथे स्वतः घरे बांधली आहेत. प्रकल्पग्रस्तांनी स्वेच्छा पुर्नवसनाचे लाभ स्वीकारले आहेत, त्यामुळे प्रश्नात नमुद सुविधा त्यांना अनुज्ञेय नाहीत.

---

**राज्यातील निराधार वृध्द व्यक्तींसाठी श्रावणबाळ सेवा राज्य निवृत्तीवेतन योजना व केंद्र शासनाच्या इंदिरा गांधी राष्ट्रीय वृध्दापकाळ निवृत्तीवेतन योजना सुरु केल्याबाबत**

**(३२) १०६२७ (०९-०४-२०१५). श्री. उल्हास पाटील (शिरोळ) :** सन्माननीय **विशेष सहाय्य मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) राज्यातील निराधार वृध्द व्यक्तींना मासिक निवृत्तीवेतन देणाच्या हेतूने श्रावणबाळ सेवा राज्य निवृत्तीवेतन योजना व केंद्र शासनाच्या इंदिरा गांधी राष्ट्रीय वृध्दापकाळ निवृत्तीवेतन योजना सुरु केली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, श्रावणबाळ सेवा राज्य निवृत्तीवेतन योजना गट ब ह्या योजनेतून जे गरजू निराधार वृध्द आहेत पण दारिद्र्य रेषेखालील यादीमध्ये ज्यांची नोंद नाही व ज्याच्या कुटूंबाचे वार्षिक उत्पन्न रु.२१०००/- पर्यंत असेल तर अशा वृध्दांस संपूर्ण रु.६००/- इतका लाभ होतो, हे खरे आहे काय,
(३) असल्यास, सदर योजनेंतर्गत लाभार्थ्यांच्या कुटूंबाची वार्षिक उत्पन्न रु.२१०००/- पर्यंत असलेली अट शिथील करुन लाभार्थ्यांना मिळणारा रु.६००/- लाभाची रक्कम दुप्पट करण्याबाबत शासन स्तरावर काय कारवाई करण्यात आली वा येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. राजकुमार बडोले (२८-०५-२०१५) :** (१) होय, हे खरे आहे.
(२) होय, हे खरे आहे.
(३) लाभार्थ्यांच्या कुटुंबाच्या वार्षिक उत्पन्न मर्यादेमध्ये वाढ करण्याची तसेच मासिक निवृत्तीवेतनामध्ये वाढ करण्याची बाब शासनाच्या विचाराधीन आहे.
(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

## चेंबूर आणि गोवंडी येथील शिधावाटप कार्यालयात अपुरा कर्मचारी असल्याबाबत

**(३३) १०६४२ (०७-०४-२०१५). श्री. सुनिल प्रभू (दिंडोशी), श्री. अर्जुन खोतकर (जालना), श्री.अजय चौधरी (शिवडी), श्री. प्रकाश आबिटकर (राधानगरी), श्री. सुनिल राऊत (विक्रोळी), श्री. संजय पोतनीस (कलिना) :** सन्माननीय **अन्न, नागरी पुरवठा व ग्राहक संरक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) अन्न सुरक्षा विधेयकामुळे सामान्य नागरिकांना अत्यल्प दराने अन्न धान्य पुरवठा करण्याचे आदेश शासनाने मुंबईतील सर्व शिधावाटप दुकानांना दिले आहेत, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, चेंबूर व गोवंडी येथील शिधावाटप कार्यालयात अपुरा कर्मचारीवर्ग असल्याने सदर योजनांची कामे प्रलंबित असल्याचे माहे जानेवारी, २०१५ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, सदर कार्यालयातील विविध संवर्गातील किती पदे रिक्त आहेत व त्याची कारणे काय आहेत,
(४) असल्यास, उक्त पदे तातडीने भरण्याबाबत कोणती कार्यवाही केली आहे वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. गिरीश बापट (१२-०५-२०१५) :**(१) होय.
(२) नाही.
(३) शिधावाटप कार्यालय क्रमांक -३३ ई-चेंबूर या कार्यालयात १७ पदे रिक्त आहेत. तसेच शिधावाटप कार्यालय क्र.४४ ई-गोवंडी या कार्यालयात १६ पदे रिक्त आहेत.

पदे रिक्त राहाण्याची कारणे-

अ) पदोन्नतीच्या कोटयाच्या पदावर पदोन्नती देण्याकरिता आवश्यक असलेली पात्रता धारण करणारे कर्मचारी खालच्या पदावर पुरेशा संख्येत उपलब्ध नाहीत.

ब) महाराष्ट्र लोकसेवा आयोगामार्फत नियुक्ती झालेल्या कर्मचा-यांपैकी काही लिपिक-टंकलेखक सेवा सोडून गेलेले आहेत.

(४) पदे भरण्याबाबत करण्यात येत असलेली कार्यवाही.

अ) शिधावाटप अधिकारी, सहायक शिधावाटप अधिकारी, शिधावाटप निरीक्षक/वरिष्ठ लिपिक/ उपलेखापाल संवर्गात पदोन्नती देण्याची आवश्यक ती पूर्वतयारी करण्यात येत आहे.

ब) लिपिक-टंकलेखक संवर्गातील रिक्त पदे भरण्याकरिता सामान्य प्रशासन विभागाकडे मागणी करण्यात आली आहे.

(५) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

## रत्नागिरी जिल्ह्यातील लांजा तालुक्यातील वीज बिल थकलेल्या अनेक शाळांचे वीज केनक्शन बंद असल्याबाबत

**(३४) १०६७३ (०४-०४-२०१५). श्री. राजन साळवी (राजापूर) :** सन्माननीय **ऊर्जा मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) रत्नागिरी जिल्ह्यातील लांजा तालुक्यातील वीज बिल थकलेल्या अनेक शाळांचे वीज केनक्शन कट करण्यात आल्याने संगणकासहित असलेल्या शाळांमधील विद्यार्थ्यांनी संगणकाच्या ज्ञानापासून वंचित रहावे लागत असल्याचे नुकतेच माहे जानेवारी, २०१५ मध्ये निदर्शनास आल आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, तालुक्यातील प्रत्येक शाळांना व्यापारी तत्वावरील वीज कनेक्शन देयात आले आहेत, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, व्यापारी तत्वावर दिलेले वीज कनेक्शन रद्द करुन घरगुती पद्धतीने द्यावे अशी मागणी तालुक्यातून होत आहे हेही खरे आहे काय,

(४) असल्यास, याबाबत शासनाने फेरविचार केला आहे काय,

(५) नसल्यास, त्याची कारणे काय आहेत ?

**श्री. चंद्रशेखर बावनकुळे (२९-०५-२०१५) :** (१) होय.

(२) नाही. सर्व शाळांना विद्युत नियामक आयोगाच्या वीज दर आदेशानुसार सार्वजनिक सेवा या वर्गवारी अंतर्गत वीज आकारणी केली जाते.

(३) नाही.
(४) प्रश्न उद्भवत नाही.
(५) प्रश्न उद्भवत नाही.

---

**संगमेश्वर तालुक्यात (जि.रत्नागिरी) शेतकऱ्यांना जिल्हा परिषदेकडून देण्यात आलेल्या कृषि अवजारांच्या शेतकारी सहभागाच्या रक्कमेत मोठ्या प्रमाणात गैरव्यवहार झाल्याबाबत**

**(३५) १०६७७ (०८-०४-२०१५). श्री. राजन साळवी (राजापूर), श्री. भास्कर जाधव (गुहागर), श्री. हसन मुश्रीफ (कागल), श्री. जितेंद्र आव्हाड (मुंब्रा कळवा) :** सन्माननीय **ग्रामविकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) संगमेश्वर तालुक्यात (जि.रत्नागिरी) शेतकऱ्यांना जिल्हा परिषदेकडून सौरकंदील, लागवड अवजारे आदिकरिता देण्यात आलेल्या कृषि अवजारांच्या शेतकरी सहभागाच्या रक्कमेत मोठ्या प्रमाणात गैरव्यवहार झाल्याचे नुकतेच माहे जाने, २०१५ मध्ये उघडकीस आले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, सुमारे १८ लाख ३६ हजार रुपयांचा गैरव्यवहार झाल्याचे उघडकीस आले आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, यासंदर्भात शासनाने सखोल चौकशी केली आहे काय, त्यात काय आढूळन आले,
(४) तदनुसार यात दोषी आढळून आलेल्या व्यक्तींवर कोणती कारवाई करण्यात आली आहे वा येत आहे,
(५) नसल्यास, त्याची कारणे काय आहेत ?

**श्रीमती पंकजा मुंडे (०८-०५-२०१५) :** (१) हे खरे आहे.
(२) होय.
(३) व (४) संबंधीत कृषी अधिकारी श्री.आर.व्ही.कणसे यांची खातेनिहाय चौकशी प्रस्तावित करण्यात आली असून तयांना सेवेतून निलंबीत करण्यात आले होते. तथापि, विभागयी चौकशी प्रकरणातील निर्णयाच्या अधिनतेने त्यांना अकार्यकारी पदावर पुर्नःस्थापित करण्यात आले आहे.
(५) प्रश्न उद्भवत नाही.

---

**ठाणे शहरातील घोडबंदर रोड येथील सार्वजनिक बांधकाम विभागाचे शासकीय विश्रामगृह जागेसह राज्य पर्यटन विकास महामंडळाकडे वर्ग करणेबाबत**

**(३६) १०६८२ (०९-०४-२०१५). श्री.प्रताप सरनाईक (ओवळा माजिवडा) :** सन्माननीय **सार्वजनिक बांधकाम (सार्वजनिक उपक्रम वगळून) मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) ठाणे शहरातील घोडबंदर रोड येथील सार्वजनिक बांधकाम विभागाचे शासकीय विश्रामगृह जागेसह राज्य पर्यटन विकास महामंडळाकडे वर्ग करण्यात यावे अशी मागणी दिनांक १६ डिसेंबर, २०१४ रोजी वा त्या सुमारास स्थानिक लोकप्रतिनिधींनी मा.मुख्यमंत्री यांचेकडे एका निवेदनाद्वारे केली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, यासंदर्भात कोणता निर्णय घेतला आहे व त्यानुषंगाने पुढे कोणती कार्यवाही केली आहे,

(३) अद्याप या संदर्भात निर्णय झाला नसल्यास, होणाऱ्या विलंबाची कारणे काय आहेत व याबाबतची सद्यस्थिती काय आहे ?

**श्री. चंद्रकांत पाटील (२८-०५-२०१५) :** (१) होय

(२) व (३) सा.बा. विभाग व महाराष्ट्र पर्यटन विकास महामंडळ यांची एस.पी.व्ही. करण्याचा प्रस्ताव शासनाच्या विचाराधीन आहे. तद्नंतर अश्या प्रकारच्या बाबी संदर्भात यथोचित निर्णय घेतला जाईल.

---

**राज्यात सौरऊर्जा निर्मितीसाठी राज्याचे सौर ऊर्जा धोरण करण्याचा प्रस्ताव शासनाच्या विचाराधीन असल्याबाबत**

**(३७) १०६९६ (३०-०४-२०१५). श्री. प्रताप सरनाईक (ओवळा माजिवडा), श्री. अर्जुन खोतकर (जालना), डॉ. राहूल पाटील (परभणी), श्री. नारायण पाटील (करमाळा) :** सन्माननीय **ऊर्जा मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यात सौरऊर्जा निर्मितीसाठी अनुकुल वातावरण असल्याने केंद्र शासनाच्या पारंपारिक ऊर्जा धोरणानुसार राज्याचे सौरऊर्जा धोरण करण्याचा प्रस्ताव शासनाच्या विचाराधीन आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, या प्रस्तावावर शासनाने निर्णय घेतला आहे काय, त्याचे स्वरुप काय आहे व त्यानुषंगाने पुढे कोणती कार्यवाही केली आहे,

(३) या प्रस्तावावर शासनाने अद्यापही निर्णय घेतला नसल्यास, होणा-या विलंबाची कारणे काय आहेत तसेच याबाबतची सद्यःस्थिती काय आहे ?

**श्री. चंद्रशेखर बावनकुळे (०८-०५-२०१५) :** (१) हे खरे नाही.
(२) व (३) परंतु सौरऊर्जा वीजनिर्मिती प्रकल्प यासह इतर अपारंपरिक ऊर्जा स्त्रोतांपासून वीज निर्मिती करण्याचे एकत्रित धोरण जाहीर करण्याची कार्यवाही राज्य शासनाच्या विचाराधीन आहे.

---

**नांदुरा तालुक्यातील (जि.बुलढाणा) मौजे वळती बु. ते वळती खु. रस्त्यावरील ज्ञानगंगा नदीवर पुल बांधण्याबाबत**

**(३८) १०८१९ (१०-०४-२०१५). श्री. चैनसुख संचेती (मलकापूर) :** सन्माननीय **सार्वजनिक बांधकाम (सार्वजनिक उपक्रम वगळून) मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) बुलडाणा जिल्ह्यातील मलकापूर विधानसभा मतदार संघातील नांदुरा तालुक्यातील मौजे वळती बु. ते वळती खु. रस्त्यंवर ज्ञानगंगा नदीवर पुल नसल्यामुळे या रस्त्यावर सर्व सामान्य नागरिक, दुचाकी व चारचाकी वाहन धारकांना अवागमन करणे त्रासाचे झाले असल्याची बाब माहे फेब्रुवारी, २०१५ मध्ये निदर्शनास आली असून या खोलगट भागात लहान पुलाचे बांधकाम करण्यासाइी रु.५० लक्ष निधीची आवश्यकता आहे, ही बाब खरी आहे काय,
(२) असल्यास, सदर रस्त्यावर लहान पुल बांधणे अत्यंत गरजेचे आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, उपरोक्त पुलाच्या बांधकामासाठी स्थनिक लोकप्रतिनिधी यांनी मा.कार्यकारी अभियंता, सा.बां. विभाग, खामगांव यांना वेळोवेळी सूचित केले आहे, हे ही खरे आहे काय,
(४) असल्यास, याबाबत शासनाने केलेली कार्यवाही,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे ?

**श्री. चंद्रकांत पाटील (१६-०५-२०१५) :** (१) अंशत: खरे आहे.
प्रश्नाधीन पूलाच्या कामास पोचमार्गासह अंदाजे रुपये २.५० कोटी इतक्या निधीची आवश्यकता आहे.
(२) सदर रस्त्यावर मोठ्या पूलाचे बांधकाम गरजेचे आहे.
(३) होय.
(४) व (५) प्रश्नाधीन पूल हो ग्रामीण मार्गावर असून सार्वजनिक बांधकाम विभाग, खामगाव यांच्यामार्फत प्राथमिक सर्वेक्षण केलेले आहे. सदर पूलाचे निकष, मंजूरी व निधी उपलब्धतेच्या अधीन राहून हाती घेण्याचा प्रयत्न राहील.

---

**हतनुर प्रकल्प (जि.जळगांव) कालव्यांच्या निकृष्ठ कामाबाबत**

**(३९) १०८४७ (०७-०४-२०१५). श्री. हरीभाऊ जावळे (रावेर) :** सन्माननीय **जलसंपदा मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) हतनुर प्रकल्प, जि.जळगांव च्या कालव्यांच्या दुरुस्तीवर शासनाच्या मोठा निधी खर्च होऊनही नित्कृष्ट कामांमुळे कालवे नादुरूस्तच आहेत व कालव्यांचे झालेले दुरूस्तीचे काम नित्कृष्ट आहे हे खरे आहे काय,

(२) असल्यास, संबंधीत जबाबदार अधिकारी व ठेकेदारांवर कोणती कार्यवाही करण्यात आली आहे वा येत आहे ?

**श्री. गिरीष महाजन (२५-०५-२०१५) :** (१) व (२) अंशतः खरे आहे.

जागतिक बँकेच्या अर्थसहाय्याने महाराष्ट्र जलसुधार प्रकल्प योजनेतंर्गत हतनूर प्रकल्पाच्या कालवा व वितरण व्यवस्थेची कामे करण्यात आली असून या कामाची तपासणी करण्याकरीता उच्चस्तरीय समिती नियुक्त करण्यात आली होती. सदर समितीने दर्शवलिेल्या विविध कामांवरील त्रुटींची पुर्तता कत्रांटदारामार्फत व त्याच्या खर्चाने करुन कामातील उणीवा दूर करण्यात आल्या आहेत व कंत्राटदारावर क्षेत्रिय कार्यालयाकडून निविदा शर्तीनुसार कार्यवाही करण्यात आली आहे.

---

**कोंढवा बु. (जि.पुणे) येथील नागरिकांना हवेली तहसील रेशनिंग कार्यालयाऐवजी पुणे अन्न धान्य वितरण कार्यालयाच्या ड परिमंडळामध्ये समाविष्ट करण्याची मागणी**

**(४०) १०८७३ (०७-०४-२०१५). श्री. योगेश टिळेकर (हडपसर), श्री. जगदीश मुळीक (वडगाव शेरी), श्री. भिमराव तापकीर (खडकवासला) :** सन्माननीय **अन्न, नागरी पुरवठा व ग्राहक संरक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) हडपसर विधानसभा मतदार संघातील कोंढवा बु. (जि.पुणे) येथील नागरिकांना हवेली तहसील रेशनिंग कार्यालयाऐवजी पुणे अन्न धान्य वितरण कार्यालयाच्या ड परिमंडळामध्ये समाविष्ट व्हावे तसेच हडपसर विभागासाठी असलेले ड परिमंडळ कार्यालय शिवाजीनगर ऐवजी हडपसर येथे सुरु करावे अशा प्रकारची लेखी मागणी दिनांक २३ जानेवारी, २०१५ रोजी वा त्यासुमारास स्थानिक लोकप्रतिनिधींनी मा.अन्न नागरी पुरवठा मंत्री व जिल्हाधिकारी, पुणे यांना केली, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, कोंढवा बु. येथील नागरिकांची सदर मागणी अनेक वर्षापासून प्रलंबित आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, सदर मागणीबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. गिरीश बापट (१२-०५-२०१५) :** (१) होय
(२) व (३) होय.
प्रस्तावाची छाननी पूर्ण झाली असून प्रस्ताव विचाराधीन आहे.
(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

**कोंढवा (जि.पुणे)येथील एका गोदामावर पोलिसांनी छापा टाकून त्यात स्वस्त धान्य दुकानातील धान्य काळ्या बाजारात विक्रिसाठी नेत असताना पकडल्याबाबत**

**(४१) १०८७८ (०७-०४-२०१५). श्री. योगेश टिळेकर (हडपसर), श्री. जगदीश मुळीक (वडगाव शेरी), श्री. भिमराव तापकीर (खडकवासला) :** सन्माननीय **अन्न, नागरी पुरवठा व ग्राहक संरक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) कोंढवा (जि.पुणे) येथील एका गोदामामधील स्वस्त धान्य शिधावाटप दुकानातील धान्य काळ्या बाजारात विक्रिसाठी नेत असताना माहे डिसेंबर, २०१४ मध्ये वा त्या दरम्यान पोलिसांनी छापा टाकून पकडले, हे खरे आहे काय,
(२) तसेच, सदर परिसरात पुरवठा विभागाने स्वस्त धान्य शिधावाटप दुकानदारांची तपासणी मोहीम सुरु करुन सहा महिन्यांच्या दप्तरांची तपासणी केली आहे काय, तपासणीमध्ये काय आढळून आले,
(३) असल्यास, उक्त प्रश्न भाग (१) व (२) बाबत चौकशी करण्यात आली आहे काय, त्यानुषंगाने संबंधित शिधावाटप दुकानदारांवर कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची सर्वसाधारण कारणे काय आहेत ?

**श्री. गिरीश बापट (११-०५-२०१५) :**(१) होय, पोलिस निरिक्षक, गुन्हे शाखा युनिट पुणे यांनी दिनांक १६ डिसेंबर, २०१४ रोजी १३७६ तांदुळाची पोती व २३६ गव्हाची पोती असा एकूण २७५२ क्विंटल तांदूळ व ४७२ क्विंटल गहू जप्त केला आहे.
(२) या गुन्ह्याचा अनुषंगाने, तपासणी पथकामार्फत एकूण ४६ रास्तभाव दुकानाच्या तपासण्या केला असता, आढळून आलेल्या किरकोळ दोषांच्या अनुषंगाने पुढील कारवाई करण्यात येत आहे.
(३) संबंधितांवर मार्केट यार्ड पोलिस स्टेशन, पुणे येथे जीवनावश्यक वस्तु कायदा १९५५ च्या कलम ३ व ७ अन्वये दिनांक १४ डिसेंबर, २०१४ रोजी गुन्हा दाखल करण्यात आला आहे.
तसेच या गुन्ह्यांशी संबंधित नऊ परवानाधारकांची सखोल चौकशी केली असून ते दोषी असल्याचे आढळून आल्याने त्यांना कारणे दाखवा नोटीस देवून सदर ९ परवाने दिनांक २७ जानेवारी, २०१५ च्या आदेशान्वये कायमस्वरूपी रद्द करण्यात आलेले आहेत.
(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

**पुणे शहरामध्ये दहशतवाद विरोधी पथकाने शस्त्र बाळगणा-याला आणि अमलीपदार्थांची विक्री करणाऱ्यांना अटक केल्याबाबत**

**(४२) १०९०१ (०७-०४-२०१५). श्री. योगेश टिळेकर (हडपसर), श्री. जगदीश मुळीक (वडगाव शेरी), श्री. भिमराव तापकीर (खडकवासला) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) पुणे शहरामध्ये दहशतवाद विरोधी पथकाच्या पुणे युनिटने मोठ्या प्रमाणावर शस्त्र बाळगणा-याला आणि अंमलीपदार्थांची विक्री करणाऱ्यांना अटक केल्याचे जानेवारी, २०१५ च्या दुसऱ्या आठवड्यात निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास आरोपीवर गंभीर गुन्ह्याची नोंद असल्याचे व तो जमीन खरेदी-विक्री व्यवसायात सक्रीय असल्याचे तसेच पुण्यातील वेगवेगळ्या गुन्हेगारी टोळ्यांशी संबंध असल्याचे उघडकीस आले आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, आरोपीवर कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (१९-०५-२०१५) :** (१) होय, दि.१६.१.२०१५ व दि.१७.१.२०१५ रोजी अटक केलेल्या दोन आरोपींपैकी पहिलया आरोपीकडे वडगाव फाट, सिंहग रोड, पुणे येथे अग्नीशस्त्र परवाना नसताना बोकायदेशीररित्या ६ देशी बनावटीचे पिस्तुले व ११ जिवंत काडतुसे व दुस-या आरोपीकडे गुंजन चौक, येरवडा, पुणे येथे एकूण ९७० ग्रॅम चरस नावाचा अंमली पदार्थ विक्री करण्यासाठी आणाला असता मिळून आला.

(२) पहिलया आरोपी विरुध्द स्वारगेट पोलीस स्टेशन, पुणे शहर गु.र.नं.३३२३/२००७ मुंबई पोलीस ॲक्ट कलम ३७(१) सह ३५ ऑर्क्स अम्क्ट कलम -४ (२५) प्रमाणे गुन्हा दाखल आहे.

दुस-या आरोनी विरुध्द पुणे कार्यक्षेत्राच्या हद्दीत कोणत्याही प्रकारचा गुन्हा दाखल नाही.

(३) पहिलया आरोपी विरुध्द द.वि.प. पोलीस ठाणे गु.र.नं.०१/२०१५ भारताचा इत्यार कायदा कलम ३,२५ प्रमाणे गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

दुस-या आरोपी विरुध्द द.वि.प. पोलस ठाणे गु.र.नं.२/१५ एनडीपीएस ॲक्ट कलम ८,२०(ब) प्रमाणे गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

**गोराई-३ येथील क्लस्टर क्र.२८४ ते २९६ या भूखंडासाठी म्हाडाने १९९४ मध्ये सोडत काढून लाभार्थ्यांकडून २५ टक्के रक्कम भरून घेतल्याबाबत**

**(४३) १०९२८ (०७-०४-२०१५). श्री. बसवराज पाटील (औसा), ॲड. वारीस पठाण (भायखळा), श्री. अशोक पाटील (भांडूप पश्चिम) :** सन्माननीय **गृहनिर्माण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) गोराई-३ येथील क्लस्टर क्र.२८४ ते २९६ या भूखंडासाठी म्हाडाने १९९४ मध्ये सोडत काढून लाभार्थ्यांकडून २५ टक्के रक्कम भरूनही घेतली तद्नंतर लाभार्थ्यांनी उर्वरित ७५ टक्के रक्कम

भरून सोसायटी स्थापन करून बांधकाम करणे क्रमप्राप्त होते, परंतू या भूखंडाला सीआरझेडचे ग्रहण लागल्यामुळे लाभार्थ्यांना भूखंडाचा ताबा देण्याची प्रक्रिया रखडल्यामुळे तब्बल २० वर्ष हा भूखंड तसाच पडून राहिला आहे, हे खरे आहे काय,
(२) गोराई येथील सदरहू मोक्याच्या ठिकाणी २ हेक्टरचा भूखंड बिल्डरच्या घशात घालण्यासाठी अधिकाऱ्यांनी संगनमताने लाभार्थीच्या बोगस सोसायटी, बोगस संमतीपत्र व अन्य बोगस कागदपत्राच्या आधारे अवघ्या १० दिवसांत (दिनांक ३ जानेवारी, २०१४ रोजी) प्रस्तावाला मंजूरी देऊन त्यानंतर काही दिवसातच बिल्डरला संमतीपत्रही देण्याचा गैरप्रकार केला आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, याप्रकरणी चौकशी करण्यात आली आहे काय,
(४) असल्यास, चौकशीत काय आढळून आले व त्यानुसार पुढे कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. प्रकाश मेहता (२६-०५-२०१५) :** (१) अशंत: खरे आहे.

सदर भूखंडाचा विकास सीआरझेड कायदयातील प्रतिबंधात्मक तरतुदीमुळे मागील २० वर्षापासून रखडलेला आहे. मा.उच्च न्यायालयाने रिट याचिका क्र. ३२४०/२००४ मध्ये दि. ०६/१०/२००५ रोजी दिलेल्या आदेशानुसार कांदळवनापासून ५० मी. अंतरापर्यंत असलेल्या भुंखडाच्या विकमासास स्थगिती दिली. सदरचे भूखंड हे कांदळवनापासून ५० मी. अंतरापर्यंत असल्याने उपरोक्त वसाहतीचा पुनर्विकास रखडला आहे.
(२), (३) व (४) सदर अभिन्यासामध्ये क्लस्टर क्र. २८४ ते २९६ या एकत्रित भूखंडाचे क्षेत्र १५५८०.०३ चौ. मी. इतके असून सदर भूखंडास संलग्न असलेल्या मात्र सी.आर.झेड. क्षेत्राच्या बाहेर असलेल्या करमणूकीच्या भूखंडाचे सबस्टेशनसहीत क्षेत्र ११२५९.३३ चौ. मी. इतके आहे. सदर दोन्ही भूखंडाची अदलाबदल करुन रखडलेला पुनर्विकास करण्याबाबत म्हाडा भूखंड लाभार्थी कल्याण संघ या संबंधीत संस्थेने म्हाडाकडे त्यांच्या आर्कीटेक मार्फत प्रस्ताव सादर केला होता असे केल्यास संकुलातील २० वर्षापासून विकासास वंचित असलेल्या ३६७ लाभार्थ्यांना घरे उपलब्ध होतील, तसेच म्हाडाससुध्दा विनामूल्य घरे उपलब्ध होतील या बाबी विचारात घेऊन म्हाडाने त्यांच्या दि. ०७/०१/२०१५ च्या पत्रान्वये सदर संस्थेस काही अटी व शर्ती नमूद करुन केवळ प्राथमिक इरादापत्र (Letter of Intent) दिलेले आहे असे म्हाडाने त्यांच्या अहवालात नमूद केले आहे.

त्यानुसार सदर संस्थेस आवश्यक अटी व शर्तीची पूर्तता करणे, महाराष्ट्र कोस्टल झोन मॅनेजमेण्ड ऑथोरिटी (MCZMA), मिनिस्ट्री ऑफ इनव्हॉर्नमेण्ट फॉरेस्ट ॲण्ड क्लायमेट चेंज (MOEF), बृहन्मुंबई महानगरपालिका व इतर आवश्यक सर्व विभागाकडून मंजूऱ्या प्राप्त करणे, सुधारित अभिन्यास मंजूर करणे इत्यादी बाबींची पुर्तता करणे आवश्यक आहे. सदर सर्व अटी व शर्तीची पूर्तता केल्यानंतर सदर संस्थेस म्हाडाकडून अंतिम देकारपत्र जारी करण्याचे प्रस्तावित आहे. तसेच मा.मुंबई उच्च न्यायालयात प्रलंबित जनहित याचिका क्र.८७/२००६ मध्ये होणारा अंतिम निर्णय संस्थेस बंधनकारक राहील अशी ही अट म्हाडाने प्राथमिक इरादापत्रात नमूद केली आहे.

असे असले तरी सी.आर.झेड.मुळे बाधीत असलेल्या म्हाडाच्य विविध भूखंडांवर गृहनिर्माण प्रकल्प राबविण्यासाठी मा.मुंबई उच्च न्यायालयाच्या दि. ०६/०१/२००५ च्या स्थगिती आदेशामधून सूट मिळण्यासाठी जनहित याचिका क्र. ८७/२००६ मध्ये म्हाडाने नोटीस ऑफ मोशन क्र. ७४३/२०१४ मा.मुंबई उच्च न्यायालयात दाखल केलेला आहे. त्यामध्ये मा.मुंबई उच्च न्यायालयाने दि. ०९/०३/२०१५ रोजी अंतरिम आदेश दिले असून त्यानुसार बृहन्मुंबई महानगरपालिकेने सी.आर.झेड. अधिसुचना दि. ०२/०१/२०११ मध्ये नमुद अट क्र.१ (कांदळवनाचे क्षेत्र) १००० चौ. मी. पेक्षा जास्त आहे किंवा कसे व मुद्दा क्र. २ (सदर भूखंड कांदळवनापासून ५० चौ.मी. च्या आत आहे किंवा कसे) या अटीच्या आधारे म्हाडाच्या संबंधित भूखंडांचे सर्वेक्षण करुन तसा अहवाल मा.मुंबई उच्च न्यायालयासमोर ४ आठवडयात सादर करावा, असे निर्देश दिले आहेत. सबब सदर अहवाल मा.मुंबई उच्च न्यायालयात बृहन्मुंबई महानगरपालिकेकडून सादर झाल्यानंतर गोराई येथील वर नमूद सी.आर.झेड. बाधीत भूखंडावर राबविण्याच्या प्रकल्पाबाबत मा.मुंबई उच्च न्यायालयाच्या अंतिम आदेशानुसार पुढील कार्यवाही करण्यापूर्वी या प्रकरणी योग्य असा धोरणात्मक निर्णय होण्याच्या दृष्टीने शासनस्तरावर आदेशार्थ प्रस्ताव सादर करावा अशा सुचना शासनाच्या दि. १२.०५.२०१५ च्या पत्रान्वये म्हाडास देण्यात आलेल्या आहेत.

(५) प्रश्न उद्भवत नाही.

---

**राज्यातील अपंगासाठीच्या धोरणानिर्मितीचा प्रस्ताव प्रलंबित असल्याबाबत**

**(४४) १०९३७ (०९-०४-२०१५). श्री. बसवराज पाटील (औसा), श्री. अस्लम शेख (मालाड पश्चिम) :** सन्माननीय **सामाजिक न्याय मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यातील अपंगासाठीच्या धोरणानिर्मितीचा प्रस्ताव मागील २ वर्षापासून प्रलंबित असल्याने व याबाबत पाठपुरावा करुनही शासनाने धोरण लागू केलेले नाही, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, आर्थिक बोजा न टाकता तसेच या धोरणास शासनाच्या सर्व विभागाची मान्यता असूनही धोरण राबविण्यास विलंब होत असल्याने राज्यातील अपंगासाठीचे धोरण लागू करण्यात यावे अशी मागणीचे एक निवेदन दिनांक १४ जानेवारी, २०१५ रोजी वा त्यासुमारास मा.मुख्यमंत्र्यांना महाराष्ट्र राज्य अपंग धोरणनिर्मिती कृती समितीच्या वतीन सादर केले आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, अपंगासाठीचे धोरण लागू करण्यास विलंब होण्याची सर्वसाधारण कारणे काय आहेत ?

**श्री. राजकुमार बडोले (२५-०५-२०१५) :** (१) व (२) होय, हे खरे आहे.

(३) अपंगांच्या सर्वांगिण विकासासाठी तयार करण्यात आलेल्या धोरणाचा मसुदा तत्कालीन मंत्रीमंडळाच्या मान्यतेसाठी दि.३० ऑगस्ट, २०१४ रोजी सादर करण्यात आला होता. तथापि, सदर प्रस्ताव त्यावेळी चर्चेसाठी येऊ शकला नाही. अपंग धोरणाचा प्रस्तुत मसुदा फेरतपासून पुनश्चः मंत्रीमंडळाच्या मान्यतेसाठी सादर करण्याची कार्यवाही शासनस्तरावर सुरु आहे.

---

## सोलापूर येथील यंत्रमागावर पट्टा चादरीचे उत्पादन घेण्यास बंदी असल्याबाबत

**(४५) १०९५५ (१०-०४-२०१५). कुमारी प्रणिती शिंदे (सोलापूर शहर मध्य) :** सन्माननीय **वस्त्रोद्योग मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) सोलापूर येथील पट्टा चादर ही हातमाग उद्योगासाठी राखीव असून यंत्रमागावर पट्टा चादरीचे उत्पादन घेण्यास बंदी आहे त्यामुळे पट्टा चादरी उत्पादकांना अनेक अडचणींना सामोरे जावे लागत असल्यामुळे पट्टा चादरी वरील आरक्षण काढून टाकण्याबाबत तेथील उद्योजकांची मागणी आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, याबाबत शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीत काय आढळून आले व तदनुसार शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. चंद्रकांत पाटील (१८-०५-२०१५) :**(१) पट्टा चादरी वरील आरक्षण काढून टाकण्याबाबत कोणत्याही उद्योजकांनी मागणी केल्याबाबतचा संदर्भ शासनास अथवा संचालक (वस्त्रोद्योग) यांचेकडे प्रापत झला नाही. तथापि, या विषयाबाबत अर्थसंकल्पिय अधिवेशनात कपात सूचना मांडण्यात आली असून सदर कपात सूचना प्राप्त आहे.

(२) केंद्र शासनाच्या हातमाग (उत्पादनसाठी वाणांचे आरक्षण) कायदा, १८८५ नुसार एकूण ११ वाण हातमागासाठी राखीव असून यंत्रमागाउवर सदर उत्पादन घेण्यास बंदी आहे. सदरचा विषय केंद्र शासनाच्या अखत्यारित आहे.

(३) राज्य शासनामार्फत कार्यवाही करण्याचा प्रश्न उद्भवत नाही.

---

## परभणी जिल्ह्यातील महावितरण कंपनीमध्ये कर्मचाऱ्यांची पदे भरण्याबाबत.

**(४६) १०९९८ (३०-०४-२०१५). डॉ. राहूल पाटील (परभणी) :** सन्माननीय **ऊर्जा मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) परभणी जिल्ह्यातील आठ शहरे ८३५ गांवामध्ये महावितरणचे विविध तीन लाख ५२ हजार ३६७ ग्राहक असून त्यांना सेवा देण्याचे काम केवळ ८०० कर्मचारी करीत असल्याचे नुकतेच माहे डिसेंबर, २०१४ मध्ये निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, जिल्ह्यात ग्राहकांची वाढलेली संख्या, कर्मचाऱ्यांची वाणवा, एक विभाग बंद करण्याचा निर्णय, तर प्रत्येक कर्मचाऱ्यांवर दहा गावांचा कारभार सांभाळण्याची जबाबदारी आल्यामुळे जिल्ह्यातील महावितरणाची सेवा विस्कळीत झाली आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, यासंदर्भात शासनाने चौकशी केली आहे काय, त्यात काय आढळून आले आहे,

(४) तदनुसार पुढे कोणती कार्यवाही केली आहे वा करण्यात येत आहे?

**श्री. चंद्रशेखर बावनकुळे (१३-०५-२०१५) :** (१) हे अंशत: खरे आहे.
(२) नाही.

ज्या मंडल कार्यालयांतर्गत एकच विभागीय कार्यालये आहे. अशा विभागाचे मंडल कार्यालयामध्ये विलिनीकरण करण्यात आले आहे. त्यानुसार परभणी विभाग हा परभणी मंडलांतर्गत विलिन करण्यात आलेला आहे.
(३) व (४) परभणी विभागीय कार्यालय सुर करण्याबाबत महावितरण कंपनी मार्फत आढावा घेण्याची कार्यवाही सुरु आहे.

---

**परभणी जिल्हयातील वृध्द कलावंताच्या मानधनाचे प्रस्ताव प्रलंबित असल्याबाबत**

**(४७) ११००८ (०७-०४-२०१५). डॉ. राहूल पाटील (परभणी) :** सन्माननीय **सांस्कृतिक कार्य मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) परभणी जिल्हयातील वृध्द कलावंताच्या मानधनाचे जिल्हा समितीने मंजूर केलेले प्रस्ताव शासनाकडे सन २०१० पासून प्रलंबित आहेत, हे खरे आहे काय
(२) असल्यास, सदर प्रस्ताव प्रलंबित राहण्यामागची कारणे काय आहेत,
(३) असल्यास, याबाबत शासनाने चौकशी केली आहे काय, त्यात काय आढळून आले, तदनुसार सदर प्रस्तांवाना तात्काळ मंजूरी देण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, त्याची कारणे काय आहेत?

**श्री. विनोद तावडे (१३-०५-२०१५) :** (१) होय, हे खरे आहे.
(२), (३) व (४) नव्याने पात्र ठरलेल्या कलावंतांना मानधन वितरीत करण्यासाठी आवश्यक असलेल्या निधी उपलब्ध करुन घेण्याची कार्यवाही सुरु आहे.

---

**उस्मानाबाद जिल्हयातील शेतकऱ्यांच्या माती परीक्षनाकडे**
**मृत सर्वेक्षण विभागाचे होत असलेले दुर्लक्ष**

**(४८) ११०२४ (०४-०४-२०१५). श्री.राणाजगजीतसिंह पाटील (उस्मानाबाद), श्री.रमेश कदम (मोहोळ), श्री.राजेश टोपे (घनसावंगी), श्री.राहुल मोटे (परांडा), श्री.सुरेश लाड (कर्जत), श्री.जितेंद्र आव्हाड (मुंब्रा कळवा) :** सन्माननीय **कृषी मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) उस्मानाबाद जिल्हयातील शेतकऱ्यांच्या माती परीक्षनाकडे मृद सर्वेक्षण विभागाचे होत असलेले दुर्लक्ष माहे डिसेंबर, २०१४ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, माहे एप्रिल, २०१४ ते नोव्हेंबर, २०१४ या कालावधीत ३७९७ माती नमुन्यांची तपासणी झालीच नाही, ही धक्कादायक माहिती समोर आली, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, तपासनीस होणाऱ्या विलंबाची कारणे काय ?

**श्री. एकनाथराव खडसे (१९-०५-२०१५) :** (१) हे खरे नाही.
(२) हे खरे नाही. सन २०१४-१५ मध्ये ९६३३ सर्व साधारण मृद नमुने ७०९१ सुक्ष्म मुलद्रव्ये नमुने, १६१३ विशेष मृद नमुने यांची आणि ४१२९ पाणी नमुने यांची तपासणी जिल्हा मृत सर्वेक्षण व मृत चाचणी प्रयोगशाळा उस्मानाबाद यांनी केलेली आहे. लक्षकांच्या तुलनेत साध्य १०० टक्के पेक्षा जास्त आहे.
(३) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

## उस्मानाबाद जिल्हयातील ७०१ दुध संस्थांनी सहकार कायद्यातील नियमाची पूर्तता केली नसल्याबाबत

**(४९) ११०३८ (०९-०४-२०१५). श्री. राणाजगजीतसिंह पाटील (उस्मानाबाद), श्री. रमेश कदम (मोहोळ), श्री. राहुल मोटे (परांडा), डॉ. सुरेश (भाऊ) खाडे (मिरज), श्री. जितेंद्र आव्हाड (मुंब्रा कळवा) :** सन्माननीय **दुग्धविकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) उस्मानाबाद जिल्हयातील ७०१ दुध संस्थांनी सहकार कायद्यातील नियमाची पूर्तता केली नसल्याचे माहे डिसेंबर, २०१४ च्या तिस-या आठवडयात निदर्शनास आले, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, उक्त प्रकरणी शासनामार्फत चौकशी केली आहे काय, चौकशीत काय आढळून आले व तदनुसार पुढे कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(३) अद्याप कोणतीच कार्यवाही केली नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. एकनाथराव खडसे (०२-०६-२०१५) :** (१) हे अंशत: खरे आहे.
उस्मानाबाद जिल्हयातील १५८३ प्राथमिक दूध संस्था पैकी १४६८ संस्था यांचे कामकाज बंद असणे. ऑनलाईन माहिती सादर न करणे, निवडणुकीबाबतची माहिती न देणे, लेखापरिक्षण न करणे, ईत्यादी प्रकारच्या सहकार कायदा व नियमानुसार आवश्यक कार्यवाही न करणे ही बाब ऑक्टोबर,२०१४ ते डिसेंबर,२०१४ या कालावधीत निदर्शनास आली.
(२) सहाय्यक निबंधक, सहकारी संस्था (दुग्ध) जि.उस्मानाबाद यांनी महाराष्ट्र सहकारी संस्था अधिनियम १९६० चे कलम १०२ मधील तरतुदीनुसार त्यांच्या दि.३०/१०/२०१४ व दि.३१/१२/२०१४ च्या आदेशान्वये ८४६ व ६८२ अशा एकूण १५२८ प्राथमिक सहकारी दूध संस्था या अवसायनात काढल्या असून अवसायन प्रक्रियेचे पुढील कामकाज नियमानुसार सुरु आहे.
(३) अवसायन प्रक्रियेची कार्यवाही सुरु असल्यामुळे विलंब झालेला नाही.

---

**कोकण किनारपट्टीचा विकास आणि राज्यातील उद्योग जगताला आयात-निर्यातीसाठी उत्तम दर्जाच्या सुविधा उपलब्ध करून देण्याबाबत**

**(५०) ११०३९ (०६-०४-२०१५). श्री. राणाजगजीतसिंह पाटील (उस्मानाबाद), श्री. रमेश कदम (मोहोळ), श्री. राहुल मोटे (परांडा), श्री. जितेंद्र आव्हाड (मुंब्रा कळवा), श्री. सुरेश लाड (कर्जत) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) कोकण किनारपट्टीचा विकास आणि राज्यातील उद्योग जगताला आयात-निर्यातीसाठी उत्तम दर्जाच्या सुविधा उपलब्ध करून देण्यासाठी येथील बंदराचा विकास करणे व जयगड बंदर कोकण रेल्वेला जोडण्याचा निर्णय घेण्यात आलेला आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उक्त प्रश्नी घेतलेल्या निर्णयाचे थोडक्यात स्वरूप काय आहे व त्यानुसार आतापर्यंत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (०५-०५-२०१५) :** (१) होय.

(२) कोकण किनारपट्टीवररल रेवस-आवरे व दिघी (जि.रायगड), धामणखोल-जयगड व आंग्रे (जि.रत्नागिरी) आणि विजयदुर्ग व रेडी (जि.सिंधुदुर्ग) ही बंदरे खाजगी क्षेत्राच्या सहभागाने विकसित करण्यात येत आहेत. त्यापैकी दिघी, धामणखोल-जयगड आणि आंग्रे ही तीन बंदरे कार्यान्वित झाली आहेत. रेवस-आवरे बंदराच्या नौवहन मार्गाकरीता मुंबई पोर्ट ट्रस्टच्या सागरी हद्दीतून परवानगी मिळण्यासाठी पाठपुरावा करण्यात येत आहे. विजयदुर्ग आणि रेडी ह्या बंदरांचे पर्यावरणविषयक दाखल्यांचे प्रस्ताव केंद्र सरकारच्या विचाराधीन आहेत.

जयगड बंदर कोकण रेल्वेला जोडण्यासाठी जयगड ते डिगणी असा रेल्वेमार्ग निर्माण करण्याकरीता कोकण रेल्वे कॉ.लि. महाराष्ट्र मेरीटाईम बोर्ड आणि जे.एस.डब्ल्यू. जयगड पोर्ट लि. यांच्यामध्ये परस्पर सामंजस्य करारनामा व भागधारक करानामा स्वाक्षांकित झाला आहे. प्रकल्पाच्या अंमलबजावणीसाठी स्वतंत्र कंपनी स्थापन करण्याची कार्यवाही प्रगतीपथावर आहे.

(३) प्रश्न उद्भवत नाही.

**विधान भवन :**
**मुंबई.**

**डॉ. अनंत कळसे**
**प्रधान सचिव,**
**महाराष्ट्र विधानसभा.**

---

शासकीय मध्यवर्ती मुद्रणालय, मुंबई.